
सोमवार, १ ऑगस्ट २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १५
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

ऑगस्टच्या पहिल्याच आठवड्यात मुसळधार पावसाचा अंदाज/२
कर्जतमध्ये आक्षेपार्ह फेसबूक पोस्टप्रकरणी तरुणीवर गुन्हा/५
पनवेलमध्ये राज्यस्तरीय कुंग-फू स्पर्धा; मान्यवरांची उपस्थिती/८

## वूमन्स टीम इंडियाने पाकिस्तानला चारली धूळ



**एजबस्टन** : राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतंर्गत रविवारी (दि. ३१) झालेल्या महिलांच्या टी-२० सामन्यात भारताने पाकिस्तानचा आठ गडी राखून पराभव केला. भारताची सलामीवीर स्मृती मंधानाने धमाकेदार अर्धशतकी खेळी करून भारताच्या विजयाची शिल्पकार ठरली. पावसामुळे हा सामना १८-१८ षटकांचा झाला. पाकिस्तानने भारताला विजयासाठी १८ षटकांत १०० धावांचे माफक आव्हान दिले होते. भारताने हे लक्ष्य दोन गड्यांच्या मोबदल्यात ११.४ षटकांमध्येच पूर्ण केले. भारताच्या सलामीवीर शफाली वर्मा आणि स्मृती मंधानाने डावाची आक्रमक सुरुवात केली. मंधानाने ४२ चेंडूंत आठ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ६३ धावांची नाबाद खेळी केली. भारताचा या स्पर्धेतील हा पहिलाच विजय ठरला आहे.

### पत्राचाळ जमीन घोटाळा प्रकरण

# शिवसेना खा. संजय राऊत ईडीच्या ताब्यात

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील गोरेगाव येथील पत्राचाळ जमीन घोटाळाप्रकरणी शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांना रविवारी (दि. ३१) सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) ताब्यात घेतले आहे. त्यानंतर त्यांना ईडी कार्यालयात नेण्यात आले. दरम्यान, राऊत यांच्या घरातून ११.५० लाख रुपये जप्त करण्यात आल्याचे वृत्त आहे.



ईडीच्या पथकाने रविवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास संजय राऊत यांच्या घरी छापा मारला. शिवसैनिक येणार असल्याचा अंदाज असल्याने मुंबई पोलीस आणि राज्य राखीव पोलीस दलाचे जवान राऊत यांच्या घराबाहेर तैनात करण्यात आले होते. ईडीच्या अधिकाऱ्यांकडून राऊतांच्या घरी कागदपत्रे आणि दस्ताऐवज तपासण्यात आले. अखेर नऊ तासांच्या चौकशीनंतर राऊत यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्यांना ईडी कार्यालयात आणण्यात आले.

पत्राचाळ जमीन घोटाळा तब्बल १,०३४ कोटी रुपयांचा आहे. मुंबईमधील गोरेगाव येथील पत्राचाळीत महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाचा (म्हाडा) भूखंड आहे. संजय राऊत यांचे निकटवर्तीय प्रवीण राऊत यांच्या गुरू आशिष कन्स्ट्रक्शन कंपनीला ही चाळ विकसित करण्याचे काम देण्यात आले होते, मात्र त्यांनी या जागेचा काही भाग खासगी बिल्डरांना विकला, असा आरोप आहे तसेच पत्राचाळीत राहणाऱ्या नागरिकांची फसवणूक केल्याचाही आरोप आहे.

या प्रकरणी ईडीने संजय राऊत यांना ताब्यात घेतल्याने त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. शिवसेनेलाही हा मोठा धक्का मानला जात आहे.

# कर्जत आगरी समाज संघटनेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सत्कार





**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दहावी, बारावी तसेच विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ३१) गौरविण्यात आले. या वेळी त्यांनी गुणवंतांचे कौतुक करून करिअरविषयी मार्गदर्शन केले.

नेरळ-कोल्हारे येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष व जि.प.चे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, संघटनेचे माजी अध्यक्ष सावळाराम जाधव, एकनाथ धुळे, नागो गवळी, नामदेव गोमारे, भाजपचे तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, इतिहास संशोधक वसंत कोळंबे, अरुण कराळे, शिवाजी खारिक, राजेश भगत, संतोष जामघरे, भूषण पेमारे, बबिता शेळके, भगवान धुळे आदी पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

कर्जत तालुक्याला शैक्षणिक इतिहास असून येथे प्रतिभावंत तरुण घडत आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन केल्यास उच्च अधिकारी या तालुक्यातून पुढे येऊ शकतात, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केला.

कर्जत तालुक्यातून दहावीमध्ये प्रथम आलेली आगरी समाजातील पूर्वा तुकाराम मोरगे तसेच दहावी आणि बारावीमध्ये प्रत्येक शाळेत, कनिष्ठ महाविद्यालयात पहिल्या आलेल्या विद्यार्थ्यांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. तालुक्यात दहावी आणि बारावीमध्ये ८०टक्के हून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सत्कार केला गेला. याशिवाय समाजातील मुलांनी विविध क्षेत्रांत तसेच स्पर्धांमध्ये यश संपादन करून नाव उंचावले आहे त्यांचा या सोहळ्यात विशेष सन्मान करण्यात आला.

# राज्यातील सत्तासंघर्षावर आता बुधवारी सुनावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सत्तासंघर्षासंदर्भात दाखल याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार नाही. आता ही सुनावणी सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांच्या अध्यक्षतेखालील पीठापुढे बुधवारी (दि. ३) ठेवण्यात आली आहे.

शिंदे सरकारच्या आणि विधानसभा अध्यक्षांच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिका आणि शिंदे गटातील आमदारांना अपात्र ठरविण्याबाबत विधानसभा उपाध्यक्षांनी दिलेल्या नोटीसींना आव्हान



देणाऱ्या याचिकांवर बुधवारी एकत्रित सुनावणी होईल. केंद्रीय निवडणूक आयोगाने मूळ शिवसेना कोणाची हे ठरविण्यासाठी पुरावे दाखल करण्यास पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मुख्यमंत्री शिंदे यांना ८ ऑगस्टपर्यंत मुदत दिली आहे. त्या निर्णयास आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणीची विनंती सरन्यायाधीशांना गेल्या आठवड्यात करण्यात आली होती. ही याचिकाही अन्य याचिकांबरोबर सुनावणीसाठी येणार आहे.

या सर्व याचिकांवर सरन्यायाधीश रमणा, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी आणि न्यायमूर्ती हिमा कोहली यांच्या त्रिसदस्यीय पीठापुढे २० जुलै रोजी सुनावणी झाली होती. तेव्हा काही मुद्द्यांवर हे प्रकरण घटनापीठाकडे पाठविण्याचा विचार करावा लागेल, असे सूतोवाच सरन्यायाधीशांनी केले होते. ही सुनावणी त्रिसदस्यीय पीठापुढे बुधवारी होईल.

## बोरघाटात मिनीबस उलटून प्रवासी जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

लोणावळ्याहून मुंबई साकीनाका व मरोळ भागात जाणाऱ्या मिनीबसला रविवारी (दि. ३१) बोरघाटात अपघात होऊन प्रवासी किरकोळ जखमी झाले. त्यांच्यावर खोपोली पालिका रुग्णालयात उपचार करून रेल्वेने मुंबईला रवाना करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून बस अपघातांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.

## निवडक

### इसिस कनेक्शनप्रकरणी कोल्हापुरातून दोघे ताब्यात

**कोल्हापूर** : दहशतवादी संघटना इसिसशी संपर्क असल्याच्या संशयातून राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) रविवारी (दि. ३१) देशातील सहा राज्यांत छापे टाकले. यामध्ये महाराष्ट्रातील नांदेड आणि कोल्हापूरचाही समावेश आहे. कोल्हापूरमधील हुपरी येथून एनआयएने इर्शाद शौकत शेख आणि अल्ताफ शेख या दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. ते सख्खे भाऊ असल्याचे कळते.

### अर्पिता मुखर्जीच्या आठ बँक खात्यांतून कोट्यवधींचे व्यवहार

**कोलकाता** : पश्चिम बंगालमधील शाळा सेवा आयोग भरती अनियमितता घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अर्पिता मुखर्जीच्या आठ बँक खात्यांमध्ये आठ कोटी रुपयांचे व्यवहार उघडकीस आणले आहेत. ईडीने ही खाती गोठवली आहेत.

# हर घर तिरंगा अभियानात सहभागी व्हा -पंतप्रधान मोदी

### ■ 'मन की बात'मधून देशवासीयांना आवाहन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हर घर तिरंगा अभियानात सहभागी व्हा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. ३१) मन की बात कार्यक्रमातून देशवासीयांना केले. यंदा आपण भारताचा अमृतमहोत्सवी अर्थात ७५वा स्वातंत्र्य दिन साजरा करणार आहोत. आपण सर्वजण एका अतिशय अद्भुत आणि ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार बनणार आहोत. हे महान भाग्य देवाने आपल्याला दिले असल्याची भावना या वेळी पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाला लोकचळवळीचे स्वरूप मिळाल्याचे बघून मला आनंद होत आहे. समाजाच्या सर्व स्तरातील आणि समाजातील प्रत्येक घटकातील लोक या महोत्सवाशी संबंधित विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होत आहेत. स्वातंत्र्याच्या संघर्षात भारतीय रेल्वेचे योगदान सगळ्यांना कळावे यासाठी आझादीची रेल्वे आणि रेल्वे स्टेशन नावाचा उपक्रम केंद्र सरकारकडून राबवण्यात येत आहे. झारखंडच्या गोमो जंक्शनचे आता नेताजी सुभाषचंद्र बोस जंक्शन गोमो नामांतरण करण्यात आले आहे. या स्थानकावर कालका मेलमध्ये चढून ब्रिटिश अधिकाऱ्यांना चकमा देण्यात नेताजी यशस्वी झाले होते. (पान २ वर..)

# पनवेल मनपा क्षेत्रात विकसित होणार केणीपट्टा

**पनवेल : प्रतिनिधी**

पुण्याच्या मगरपट्टा सिटीच्या धर्तीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पेठाली गावातील केणी कुटुंबीय केणीपट्टा (नगर) विकसित करतील, असा विश्वास माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी (दि. ३०) व्यक्त केला. मगरपट्टा सिटीला भेट देऊन सतीश मगर यांच्याशी चर्चा केल्यानंतर ते बोलत होते.

पुण्याजवळील मगरपट्टा शहर अशी एक टाउनशिप आहे जी सोयीसुविधांमुळे कोणत्याही नामांकित बिल्डरच्या टाउनशिपला मागे टाकते. विशेष म्हणजे ही टाउनशिप शेतकऱ्यांनी वसवली असून सतीश मगर यांनी योजना राबविली आहे. याच धर्तीवर पनवेल महापालिका क्षेत्रातील केणी कुटुंबीयांनी पुढाकार घेतला आहे. (पान २ वर..)



### मगरपट्टातील व्यवस्था कौतुकास्पद -परेश ठाकूर

आमच्याकडे आलेल्या प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांकडून मगरपट्टा सिटीची माहिती मिळाली. आमदार प्रशांत ठाकूर व आयुक्त गणेश देशमुख यांनीही तेथील व्यवस्था चांगली असल्याचे सांगितले. त्यामुळे परदेशात जाण्यापेक्षा आज आम्ही येथे भेट देऊन सतीश मगर यांच्याशी चर्चा केली. येथील शेतकऱ्यांचा झालेला आर्थिक विकास पाहायला मिळाला. कचऱ्याची विल्हेवाट लावताना त्यातून वीज निर्माण करून खर्च कसा वाचवला जातो याची माहिती शर्मा यांनी दिली. इथली सगळी व्यवस्था कौतुकास्पद आहे. त्यांनी आपल्या भागधारकांच्या मनात विश्वास निर्माण केला आहे. केणी परिवारही पनवेल परिसरात अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या मनात विश्वास निर्माण करून केणीपट्टा उभारू शकतील, असा विश्वास पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यक्त केला.

## वेध रक्षाबंधनचे



**पनवेल : भावा-बहिणीचे अतूट नाते वृद्धिंगत करणारा रक्षाबंधन सण जवळ आल्याने बाजारात आकर्षक राख्या विक्रीसाठी आल्या आहेत. रक्षाबंधनच्या दिवशी बहीण भावाच्या हाताला राखी बांधते आणि आपल्या रक्षणाची जबाबदारी त्याच्यावर सोपवते. रक्षाबंधन हे जीवनामध्ये पवित्रता व मांगल्य निर्माण करणारे बंधन आहे. हा सण जवळ आल्याने राखी खरेदीसाठी लगबग सुरू झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

### 'राष्ट्रकुल'मध्ये भारतीय वेटलिफ्टर्सचा दबदबा

# जेरेमी लालरिनुंगाने जिंकले सुवर्णपदक

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

बर्मिंगहॅम येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारतीय वेटलिफ्टर जेरेमी लालरिनुंगाने सुवर्णपदक जिंकले आहे. लालरिनुंगाने रविवारी (दि. ३१) पुरुषांच्या ६७ किलो वजनी गटात स्नॅचमध्ये १४० किलो आणि क्लीन अ‍ॅण्ड जर्कमध्ये १६० किलो असे एकूण ३०० किलो वजन उचलत सुवर्णपदक पटकाविले. याआधी मीराबाई चानूने वेटलिफ्टिंगमध्ये 'सुवर्ण' जिंकले होते.

जेरेमी लालरिनुंगापूर्वी शनिवारी संकेत महादेव सरगरने पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात रौप्यपदक जिंकले. त्यानंतर गुरुराजा पुजारीने ६१ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावले. त्याचवेळी ऑलिम्पिक पदक विजेती मीराबाई चानूने ४९ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. बिंदियारानी देवीने राष्ट्रकुल स्पर्धेत भारताला चौथे पदक मिळवून दिले. तिने ५५ किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावले.

राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने आतापर्यंत पाच पदके जिंकली असून सर्व पदके वेटलिफ्टिंगमध्ये आली आहेत. भारताने आतापर्यंत दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्यपदक जिंकले आहे.



### संकेत सरगरला ३० लाखांचे बक्षीस

**मुंबई** : राष्ट्रकुल स्पर्धेत रौप्यपदक जिंकणारा महाराष्ट्राचा वेटलिफ्टर संकेत सरगरला राज्य सरकारच्या वतीने ३० लाख तसेच प्रशिक्षकांना ७.५ लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. (सविस्तर वृत्त पान २ वर..)




श्रावण सुरू झाला की, कविमन आपोआपच श्रावणधारांसारखं पाझरू लागतं. नवनवीन कल्पना त्यांच्या डोक्यातून बाहेर पडतात आणि मग दरवर्षी पावसावरील कवितांचा जणू पाऊसच पडतो. या वेळचं वातावरण अगदी तस्संच आहे. वरुणराजाही दमदार बरसला आहे. यासाठी आम्ही सर्व कवींना आग्रहानं निमंत्रित करीत आहोत. मग विचार कसला करता, उचला आपली लेखणी आणि लिहा पाऊस कविता. आम्ही त्यास यथायोग्य प्रसिद्धी देऊ...

श्रावण संपेपर्यंत मान्यवर कवींनी शब्दबद्ध केलेल्या कविता 'रामप्रहर'मध्ये दररोज एक या प्रमाणे (एका कवीची एकच कविता) प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

कवींनी आपली अप्रकाशित कविता छायाचित्रासह 'रामप्रहर'कडे पाठवावी. त्या कवितेला 'श्रावणधारा' या सदराखाली योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल. -मुख्य संपादक

पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल ४१०२०६, रायगड.
E.mail : ramprahar@gmail.com
व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक ७७३८१०६००९

# सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची पत्रकार परिषदेत ग्वाही



**औरगांबाद : प्रतिनिधी**

सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. ३१) औरगांबाद येथे बोलताना दिली. दरम्यान मुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या दौऱ्यात अतिवृष्टी, पीकपाणी आणि विविध विकास कामांचा आढावा घेत असल्याचे या वेळी सांगितले.

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्यांदाच एकनाथ शिंदे हे मराठवाड्याच्या दौऱ्यावर आले होते. शनिवारपासून एकनाथ शिंदेंचा दोन दिवसांचा औरंगाबाद दौरा सुरु झाला आहे. रविवारी मुख्यमंत्री शिंदेंनी औरंगाबादमध्ये पत्रकार परिषद घेतली. या वेळी ते म्हणाले, सरकारकडून शेतकऱ्यांचा नेहमीच विचार होणार आहे. मुखमंत्री शिंदे पुढे असेही म्हणाले, मराठवाड्याचा आढावा घेतला. यात दुष्काळाची माहिती घेतली. घराचे नुकसान, पंचनामे, शेतीचे नुकसान आदिंची माहिती घेतली आहे. हे युतीचे सरकार आहे. ते शेतकऱ्यांना कधीही वाऱ्यावर सोडणार नाही. शेतकऱ्यांना मदत करण्याचा धोरणात्मक निर्णय कॅबिनेटमध्ये घेणार आहोत. औरंगाबाद जिल्ह्यात पाण्याचा प्रश्न आहे, तो आम्ही सोडवण्याचा प्रयत्न करतोय. वेरूळ कृष्णेश्वराच्या विकासाची मागणी आली होती. नांदेड शहराच्या रस्त्याचा प्रस्तावही आला होता. हे प्रश्न आम्ही लवकरात लवकर सोडविणार आहोत.

परभणीतील समांतर पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होणार आहे. नांदेड-जालना एक समृद्धी हायवे करणार आहोत. लातूरचे जिल्हा सामान्य रुग्णालय आहे, त्यासाठी मोफत जमीन देण्याच्या अडचणी दूर करू. घाटी रुग्णालयाबाबत सकारात्मक निर्णय घेतला आहे, असेही शिंदें म्हणाले.

## रिक्षाचालक, फेरीवाल्यांसाठी नवे महामंडळ स्थापन करण्याची मुख्यमंत्र्यांकडून घोषणा

**मालेगाव : प्रतिनिधी**

राज्यातील रिक्षाचालक तसेच फेरीवाल्यांसाठी नव्या आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. मालेगावमध्ये ते एका सभेला संबोधित करताना बोलत होते.

राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे तर उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस सत्ता हाकत आहेत. सत्तांतर झाल्यापासून शिवसेना-भाजप यांच्या संयुक्त सरकारने अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. शिवसेना-भाजपा युतीचे सरकार राज्याला न्याय देईल. राज्याला पुढे घेऊन जाईल. गोरगरीब जनतेच्या मुलांच्या जीवनात बदल झाला पाहिजे. त्यांची मुले शिकली पाहिजेत. त्यांच्या परिवाराला वैद्यकीय मदत मिळाली पाहिजे, यासाठी एक आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, असे मला दादा भुसे यांनी सांगितले आहे. रिक्षावाला, ड्रायव्हर किंवा फेरीवाले असतील, या सर्वांसाठी एक आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येणार आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. मी तुमच्यातीलच एक आहे. मला गरिबीची जाण आहे. त्यामुळे महामंडळ स्थापन करण्याचे काम युद्धपातळीवर केले जाईल. सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम हे महामंडळ करेल. माजी मंत्री दादा भुसे आणि माजी मंत्री उदय सामंत यांना त्याची जबाबदारी दिलेली आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री शिंदे सध्या राज्याच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान ते राज्यभरातील जनतेशी संवाद साधत आहेत.

## सांगलीचा वेटलिफ्टर संकेत सरगरला राज्य सरकारकडून ३० लाखांचे बक्षीस

### राष्ट्रकुल स्पर्धेत भारताला मिळवून दिले पहिले पदक



**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रकुल स्पर्धेच्या ५५ किलो वजनी गटात भारताच्या संकेत सरगरने रौप्यपदक जिंकले आहे. त्याने एकूण २४८ किलो वजन उचलून रौप्यपदक पटकावले यानंतर सांगलीसह राज्यातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव झाला. भारताचे हे राष्ट्रकुल स्पर्धेतील पहिले पदक जिंकले असल्याने विविध क्षेत्रातून संकेतला शुभेच्छाही देण्यात आल्या. यासंदर्भात, शिंदे सरकारने संकेत सरगरचे कौतुक करत त्याला बक्षीस जाहीर केले आहे. शिंदे सरकारकडून संकेतला ३० लाख रुपये जाहीर करण्यात आले आहेत. यासंदर्भात मुख्यमंत्री शिंदे यांनी ट्वीट करत ही माहिती दिली आहे.

सांगली जिल्ह्यातील कासेगाव शिक्षण संस्थेच्या आष्टा येथील आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेजचा विद्यार्थी संकेत सरगर याची बर्मिंगहॅम (इंग्लड) येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय वेटलिफ्टिंग संघामध्ये निवड झाली होती. वेटलिफ्टिंगमध्ये अशी निवड होणारा संकेत महाराष्ट्रातील पहिला खेळाडू होता. आता त्याने आपल्या पहिल्याच प्रयत्नात रौप्यपदक पटकावून सांगलीचे तसेच महाराष्ट्राचे नाव उंचावले.

संकेतने स्नॅच प्रकारात ११३ तर क्लीन अँड जर्कमध्ये १३५ किलो वजन उचलून त्याने ही कामगिरी केली. संकेतने १३९ किलो वजन उचलताना दुखापत झाली असतानाही १४१ किलो वजन उचलण्याचा प्रयत्न केला. मात्र तोही प्रयत्न फसला. जरी क्लीन अँड जर्कमधील संकेतचे दोन प्रयत्न फसले असले तरी तो एकूण २४८ किलो वजन उचलून सुवर्ण पदकाच्या रेसमध्ये आघाडीवर होता. मात्र अखेरच्या क्षणी मलेशियाच्या मोहम्मद अनिकने संकेतपेक्षा फक्त १ किलो वजन जास्त उचलत सुवर्ण पदक पटकावले.

दरम्यान, संकेतने स्वत:च्या नावावर विक्रम करतानाच भारताला राष्ट्रकुल स्पर्धेत पदकासाठीचे खाते खोलले. या मुळे त्यांच्यावर कौतुकांचे वर्षाव होत आहे. दरम्यान, त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्य सरकारच्या वतीने ३० लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

## खूनातील संशयित आरोपी कारागृहातून पळाला

**सांगली : प्रतिनिधी**

तासगाव येथील जेसीबी मालकाचा खून करणारा संशयित सुनील ज्ञानेश्वर राठोड (रा. येळगोड ता. सिंदगी जि. विजापूर) याने रविवारी (दि. ३१) सकाळी सव्वासातच्या सुमारास जिल्हा कारागृहातून पळ काढला. त्याबाबत कारागृह प्रशासनाने सांगली शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

अधिक माहिती अशी की, सुनील राठोड हा जेसीबी मालक हरी येडुपल पाटील (रा. मंगसुळी) यांच्याकडे चालक म्हणून काम करत होता. मालक हरी पाटील यांनी सुनील यांच्यामध्ये काही कारणाने वाद झाला. त्यामुळे चिडून जावून सुनील आणि त्याच्या पत्नीने ८ जून २०२१ रोजी जेसीबी मालक हरी पाटील याचा निर्घुण खून केला. पाटील याचा मृतदेह प्लास्टिक पिशवीत घालून तो विहिरीत टाकला. या प्रकरणांचा तपास तत्कालीन स्थानिक गुन्हा अन्वेषण पथकाने केला. खूनानंतर सुनील आणि त्याची पत्नी पार्वती हे दोघे जेसीबीसह पुण्याकडे निघाले होते. पोलिसांनी या दोघाना पुणे हद्दीतून अटक केली होती. सुनील हा सांगली कारागृहात जेरबंद होता. रविवारी सकाळी त्याने कारागृहातून पळ काढला आहे. त्याला पकडण्यासाठी पोलिसांकडून नाकाबंदी करण्यात आली आहे.

## ऑगस्टच्या पहिल्याच आठवड्यात मुसळधार

### हवामान विभागाचा अंदाज; विविध राज्यांना सतर्कतेचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पुन्हा एकदा काहीशा प्रमाणात पावसाने सुरुवात केली आहे. काही राज्यात पावसाची उघडीप सुरु असून काही ठिकाणी मध्यम ते हलक्या स्वरुपाचा पाऊस सुरु आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक, गोव्यासह काही भागांत मागील महिन्यात दमदार पाऊस झाला असून पूरस्थिती निर्माण झाली होती. पावसाची उपस्थिती अनियमित असल्याने आता राज्यात सध्याच्या अपेक्षित पावसापेक्षा ४४ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे.

देशातील काही भागांत ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. यामध्ये ३ आणि ४ ऑगस्ट रोजी किनारपट्टीवरील कर्नाटक राज्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच २ ते ४ ऑगस्टच्या दरम्यान उत्तर कर्नाटक, केरळात पाऊस होणार असल्याची माहिती दिली आहे. एक ते चार ऑगस्ट रोजी दक्षिण कर्नाटकातील काही भागांत आणि ४ ऑगस्टच्या दरम्यान तामिळनाडू, पुदुच्चेरी और कराईकल या भागांत पावसाची शक्यता वर्तवली आहे.



मागील काही दिवसांपासून राज्यासह देशातील छत्तीसगडमध्येही मुसळधार पाऊस झाला असल्याची नोंद आहे. दरम्यान, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये जुलै महिन्यात मुसळधार पावसाने थैमान घातले होते. यामुळे अनेक नद्यांना पूर आला होता. आता पावसाचा जोर ओसरला असला तरी पुन्हा एकदा मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान, ईशान्य अरबी समुद्र आणि पश्चिम भागात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे किनारी भागात पाऊसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच या भागातील लोकांना पुढील काही दिवस सावधानतेचा इशाराही देण्यात आला आहे. जुलै महिन्यात महाराष्ट्रासह अनेक राज्यात दमदार पाऊस कोसळला आहे. यामुळे अनेक नद्यांना पूर आला. धरणाची पाणीपातळीही वाढली. मात्र आता पावसाने उसंत घेतली असल्याने शेतीच्या कामांना वेग आला आहे.

## पुण्यातील तरुणाला सव्वा लाखाचा गंडा

**पुणे : प्रतिनिधी**

घड्याळ कंपनीकडून बोलत असल्याचे सांगून ५ हजार रुपये भरल्यास तुम्हाला लॅपटॉप फ्रीमध्ये मिळेल, या सांगण्याचा मोह न आवरल्याने एका तरुणावर तब्बल एक लाख ३४ हजार रुपये गमविण्याची पाळी आली. याबाबत उंड्री येथील एका २६ वर्षाच्या तरुणाने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

अधिक वृत्त असे, फिर्यादी यांना २१ मार्च २०२१ रोजी मोबाईलवर फोन आला. एका घड्याळाच्या कंपनीकडून बोलत असल्याचे सांगितले. कंपनीची एक ऑफर चालू आहे. त्यामध्ये तुम्ही ५ हजार रुपये भरल्यानंतर तुम्हाला त्याच्यावर एक लॅपटॉप फ्री मिळेल, असे सांगितले. फिर्यादीकडून पेटीएम द्वारे तसेच आयसीआयसीआय बँकेचे ॲपद्वारे एक प्रोसेस करण्यास सांगितले. व त्यातून फिर्यादी यांच्या खात्यातून १ लाख ३४ हजार ६४६ रुपये काढून घेऊन फसवणूक केली. पोलीस तपास करत आहेत. दरम्यान, ऑनलाइन फसवणुकीच्या घटनांत वाढ झाली आहे.



**कर्जत : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी मन की बात कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी हर घर तिरंगा अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. हा कार्यक्रम भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेरळ येथील संतोष धुळे यांच्या निवासस्थानी अनुभवला. तालुकाध्यक्ष मंगेश म्हस्कर, सरचिटणीस राजेश भगत, संजय कराळे आदी सोबत होते.**

## उरणमधील शिवमंदिरांत श्रावणी सोमवारनिमित्त कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यात बारा जागृत शिवमंदिरे आहेत. या स्वयंभू शिवमंदिरांमध्ये श्रावणी सोमवारी भक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. या निमित्ताने मंदिरात विविध अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच काही मंदिरात भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजनही मंदिर कमिटीच्या वतीने केले आहे. श्रावणी सोमवार निमित्ताने एक ऑगस्ट रोजी तालुक्यातील शिवमंदिरे भाविकांच्या दर्शनासाठी सज्ज झाल्याचे मंदिर कमिटीच्या वतीने सांगण्यात आले.

स्वयंभू शिवमंदिर या नावाने प्रसिद्ध प्राचीन शिवमंदिर जासई येथे आहे. लहान असलेल्या या शिवमंदिराचा जिर्णोद्धार सहा वर्षापूर्वी करण्यात आला आहे. हे मंदिर उरण-पनवेल, नवी मुंबई रस्त्याच्या कडेला प्राचीन स्वयंभू शिवमंदिर असल्याने अनेक भक्तगण या थांबवून शिवमंदिरात शिवलिंगाचे दर्शन घेत असतात. या शिवमंदिरात महाशिवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. सध्या हजारो भाविकांचे हे शिवमंदिर श्रध्दास्थान बनले आहे. त्यामुळे श्रावणी सोमवारच्या दिवशी गावकरी, नोकरदारवर्ग मोठ्या प्रमाणात शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी सकाळी पाच वाजल्यापासून गर्दी करत असल्याचे पुजारी हरिश्चंद्र कृष्णा ठाकूर यांच्याकडून सांगण्यात आले. दरम्यान कोरोनामुळे गेले दोन वर्षे सण उत्सव फारसे झाले नाहीत. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून प्रारंभी मंदिरे बंद करण्यात आली होती. लोकांनीही घाबरुन मंदिरात जाणे बंद केले होते. आता मात्र स्थिती पूर्ववत झाल्याने यंदा सण उत्सव उत्साहात साजरे होणार आहेत. श्रावण महिन्यात विविध सण आहेत. दरम्यान एक ऑगस्टला श्रावणी सोमवार असल्याचे दर्शनासाठी सर्वत्र गर्दी होताना पाहायला मिळणार आहे.



**पान १ वरून**

## हर घर तिरंगा अभियानात सहभागी व्हा -पंतप्रधान मोदी

देशभरातील २४ राज्यांमध्ये अशा ७५ रेल्वेस्थानकांची ओळख पटली आहे. या स्थानकांची अतिशय सुंदर सजावट करण्यात आली असून यामध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रमही आयोजित केले जात आहेत.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात होत असलेल्या या सर्व कार्यक्रमांचा सर्वांत मोठा संदेश हा आहे की, आपण सर्व देशवासीयांनी आपले कर्तव्य पूर्ण निष्ठेने पाळले पाहिजे, तरच आपण त्या अगणित स्वातंत्र्यसैनिकांचे स्वप्न पूर्ण करू शकू, त्यांच्या स्वप्नांचा भारत घडवता येईल. आपला पुढील २५ वर्षांचा हा अमृतकाळ प्रत्येक देशवासीयासाठी कर्तव्यकाळ आहे. आपल्या शूर सैनिकांनी ही जबाबदारी आपल्याला दिली आहे आणि ती पूर्ण करायची असल्याचे पंतप्रधान मोदींनी या वेळी सांगितले.

आझादीच्या अमृत महोत्सवाचा एक भाग म्हणून १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत 'हर घर तिरंगा' या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेचा एक भाग बनून तुम्ही १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान घरावर तिरंगा फडकावण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशवासियांना केले आहे.

## पनवेल मनपा क्षेत्रात विकसित होणार केणीपट्टा

स्थानिक शेतकरी तसेच पालिकेतील माजी नगरसेवक हरेश केणी यांनी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे ही संकल्पना मांडली. २९ गावांचा समावेश असलेल्या पनवेल महापालिकेचा विकास करताना शहर आणि ग्रामीण भागाचा समांतर विकास करणे आवश्यक असल्याने आयुक्त देशमुख यांनी याबाबत पालिकेच्या माध्यमातून पूर्णपणे सहकार्याची भूमिका घेतली आहे.

पनवेल तालुक्यातील तळोजा पेठाली गावातील केणी कुटुंबीयांची शेकडो जमीन सध्याच्या घडीला अस्तित्वात आहे. यापैकी काही जमीन सिडकोने संपादित केली आहे, तर उर्वरित जमीन अद्याप शिल्लक आहे. या जमिनींना सोन्याचा भाव प्राप्त झाला असताना संबंधित जमीन ही बांधकाम व्यावसायिकांना विकसित करण्यासाठी देण्याऐवजी आपणच विकसित करण्याचा निर्णय केणी कुटुंबीयांनी घेतला आहे. प्रकल्पग्रस्तांचे नेते दिवंगत दि. बा. पाटील यांनी नेहमीच स्थानिक शेतकऱ्यांना उद्योजक बनण्याचे धडे दिले. या पार्श्वभूमीवर ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी अद्याप शिल्लक आहेत अशा शेतकऱ्यांसाठी केणी कुटुंबीयांनी उचलेले पाऊल रोल मॉडेल ठरणार आहे.

माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, पापा पटेल, रवींद्र म्हात्रे तसेच चेतन जाधव, अभिजित जाधव यांनी शनिवारी (दि. ३०) पुण्याला जाऊन सतीश मगर यांची भेट घेतली. या वेळी मगरपट्टा वसवण्यासाठी काय करावे लागले, तेव्हा कोणत्या अडचणी आल्या याबाबत सतीश मगर यांच्याशी विस्तृत चर्चा करण्यात आली. त्यानंतर परिसराला भेट देऊन तेथे करण्यात आलेल्या विविध सुधारणांची माहितीही घेण्यात आली.

## कुर्ला येथे वाचा चर्चा प्रयोग संध्या उपक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

'वाचा चर्चा प्रयोग संध्या' हा उपक्रम सहा ते १२ ऑगस्ट दरम्यान सायंकाळी सहा वाजता प्रबोधन प्रयोग घर, नेहरू नगर, कुर्ला येथे आयोजित करण्यात आला आहे.

गेली चार वर्षे नाट्यकर्मींना नाट्य लेखकांच्या नवीन संहिता उपलब्ध व्हाव्यात व त्याची थेट लेखकाशी चर्चा झाल्याने प्रयोगाच्या संधी वाढाव्यात या हेतूने हा उपक्रम नाट्यवर्तुळात अत्यंत लोकप्रिय झाला आहे. यंदाचे या उपक्रमाचे पाचवे वर्ष असून लेखकांच्या उत्फुर्त प्रतिसादामुळे हा कार्यक्रम मुंबईत दोन ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. नाटककार संजय मोने, संवादक अभिनेता विजय निकम, नाटककार संभाजी सावंत, नाट्यअभ्यासक अविनाश कोल्हे, नाटककार अभिनेत्री वर्षा दांदळे, संवादिका अभिनेत्री दिशा दानडे, नाटककार चैतन्य सरदेशपांडे, संवादिका सीमा देसाई नायर, नाटककार अभिनेत्री कल्पिता राणे, संवादिका सुनीता तांबे, नाटककार कवयित्री प्रतिभा सराफ, संवादक नाटककार कवी अरुण म्हात्रे, नाटककार दिलीप जगताप, संवादक नाट्यसामीक्षक संजय कुलकर्णी यात सहभागी होणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

**दुखवटा**

## प्रकाश चौथाई



**कर्जत :** कर्जत येथील सुप्रसिद्ध नाट्य कलाकार, लेखक व शाहीर प्रकाश चौथाई यांचे प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. रंगभूमीवर विविध नाटकातून त्यांनी भूमिका केल्या होत्या. राज्य नाट्य स्पर्धेत त्यांनी पुरस्कारही प्राप्त केले होते. लोककलेच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती देणारे शाहिरी कार्यक्रम ते खेड्यापाड्यातून सादर करत. आकाशवाणीसाठी त्यांनी संस्कृत नाटक तसेच कौटुंबिक श्रुतिकांचे लेखनही केले आहे.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. १ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ ९. आंबेडकर भवन, पनवेल ■ १०. सीकेटी हायस्कूल, न्यू पनवेल
- ११. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)

ग्रामीण लसीकरण

■ पडघे उपकेंद्र ■ खिडुकपाडा ■ किरवली/आडीवली/धानसर ■ कोपरा समाजमंदिर ■ काळुंद्र ■ ओवे

ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

## निवडक

### विचुंबे येथून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** विचुंबे येथील ओंकार सोसायटीतील घरातून २१ वर्षीय रोशनी मोहम्मद चांद हाशमी ही तरुणी निघून गेली आहे. ती घरी परत न आल्याने ती हरवल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तिची उंची चार फूट, चेहरा उभट, रंग सावळा आहे. तिला हिंदी भाषा अवगत आहे. तिने गुलाबी सलवार कुर्ता आणि पायात सफेद चप्पल घातलेली आहे. या तरुणीबाबत अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक नवनाथ लवटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मृतदेहाची ओळख पटविण्याचे आवाहन

**पनवेल :** एका मृतदेहाच्या नातेवाइकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे, रंग काळा, उंची सुमारे पाच फूट पाच इंच, चेहरा उभट, बांधा सडपातळ, डोके व दाढी वरील केस वाढलेले, नाक सरळ असून अंगात काळा-पांढरा शर्ट व निळी ट्रॅक पॅन्ट आहे. या व्यक्तीबाबत माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गावी निघालेला व्यक्ती हरवला

**पनवेल :** कळंबोली येथील मॅकडोनाल्ड समोरील बस स्टॉपवरून एक व्यक्ती खासगी बस पकडून गावी निघाला तो अद्याप गावी न पोहचल्याने तो हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. राजमनी चिन्नराज (वय ४५) हे बंगलोरला (मूळ गावी) जाण्यासाठी कळंबोली येथील मॅकडोनाल्ड समोरील बस स्टॉपवरून एक खासगी बस पकडून गेले होते, परंतु ते अद्यापपर्यंत बंगलोरला पोहचले नाहीत. त्यामुळे त्यांची हरवल्याची तक्रार करण्यात आली आहे.

# आजपासून मासेमारीला सुरुवात

**उरण : रामप्रहर वृत्त**

पावसाळी हंगामात मासेमारीवर शासनाने घातलेली दोन महिन्यांची बंदी सोमवार (दि. १ ऑगस्ट)पासून उठत असल्याने मच्छीमारांची मासेमारीसाठीची लगबग सुरू आहे. उरणच्या करंजा व मोरासह इतर बंदरातील खलाशी आणि मच्छीमार यासाठी तयारीला लागले आहेत. बोटींची रंगरंगोटी, तेल आणि इतर तयारी करण्यात सध्या मच्छीमार व्यस्त आहेत. त्यामुळे येत्या दोन-तीन दिवसांत मत्स्य खवय्यांसाठी भरपूर ताजे आणि स्वस्त मासे उपलब्ध होणार आहेत.

जून व जुलै महिने हा दोन माशांचा प्रजननाचा आणि अंडी देण्याचा काळ असतो. तसेच हा पावसाळा ऋतू असल्याने समुद्र खवळलेला असल्यामुळे १ जून ते ३१ जुलै या दोन महिन्यांच्या दरम्यान खोल समुद्रातील मासेमारीवर शासनाचे बंधन असते. मच्छीमार बांधवदेखील या काळात खोल समुद्रातील मासेमारी करत नाहीत. या दोन

## मच्छीमारांची लगबग



महिन्यांच्या काळात ते आपल्या होड्यांची दुरुस्ती, रंगरंगोटी, जाळी सुधारणे अशा प्रकारची कामे करतात. या बंदीच्या दोन महिन्यांत त्यांनी ही आपली कामे पूर्ण केली असून आत्ता मोठ्या आनंदात, गाणी गात आपल्या होड्या घेऊन सातासमुद्रापलीकडे मच्छीमारी करता जाणार आहेत.

जिवावर उदार होऊन मासेमारी करून आपली उपजीविका करणाऱ्या मासेमारांची महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात संख्या आहे. १५ लाखांच्यावर कुटुंबे मासेमारी व्यवसायावर अवलंबून आहेत. या मासेमारी व्यवसायातून देशाला मोठे परकीय चलन मिळते. एकट्या महाराष्ट्रात सुमारे चार लाख ६८ हजार मेट्रिक टन मासळी पकडली जाते.

उरण तालुक्यातदेखील मच्छीमारांची संख्या लक्षणीय आहे. करंजा, मोरा, दिघोडे, हनुमान कोळीवाडा, आवरे या गावातील अनेक मच्छीमार खोल समुद्रात जाऊन मच्छीमारी करतात. देशाच्या विकासाला महत्त्वाचा हातभार लावणारा दर्याचा राजा हा नेहमी उपेक्षितांचे जिणे जगत असतो. कोळी बांधवांसाठी अनेक उपाययोजना केल्या असल्या तरी त्यांचा प्रत्यक्ष फायदा मिळण्यास खूप वेळ जातो. परदेशातील आणि परराज्यातील मासेमारांचे अतिक्रमण हा आत्ता महाराष्ट्राच्या मच्छीमारांसाठी मोठी समस्या झाली आहे.

### नव्या हंगामासाठी बोटी सज्ज

**करंजा, मोरा, दिघोडा किनाऱ्यावर दोन महिने शाकारून ठेवलेल्या बोटी मासेमारीच्या नव्या हंगामासाठी तयारीला लागल्या आहेत. दोन महिने बोटी बंद राहत असल्याने बोटीवरील जाळी, ती ओढण्यासाठी असलेली यंत्रे बोटीची सफाई करण्यास वेळ लागत असल्याची माहिती करंजा मच्छीमार सोसायटीचे माजी अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी दिली आहे.**

# खारघरमध्ये मिनीबस पुलावरून कोसळली

### चालक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

खारघर स्टेशनच्या उड्डाण पुलावरून एक मिनीबस खाली कोसळून बसचालक जखमी झाल्याची घटना मध्यरात्रीच्या सुमारास घडली आहे.

खेड येथून मिनी बस चालक इरफान खान हा त्याच्या ताब्यातील बस घेऊन मीरा रोड येथे चालला असताना खारघर स्टेशनच्या उड्डाण पुलावर त्याची बस असताना अचानकपणे एका कंटेनर ने त्याच्या बसला धडक दिली. या अपघातात बस चालकाचा गाडीवरील ताबा सुटून गाडीचे स्टेरिंग लॉक होऊन गाडी डाव्या बाजूला उड्डाणपुलावरून खाली कोसळली यात बस चालक किरकोळ जखमी झाला आहे. सुदैवाने या गाडीत प्रवाशी वर्ग नसल्याने मोठी दुर्घटना टळली आहे.



# पनवेलमध्ये घराला आग

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील विश्राळी नाका येथे असलेल्या जसधनवाला कॉम्प्लेक्समधील एका घराला रविवारी (दि. ३१) सकाळी लागलेल्या आगीत घराचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही आहे.

येथील पहिल्या मजल्यावर राहणारे महेंद्र सापल्य यांच्या घराला आग सकाळी अचानकपणे आग लागली व आगीच्या ज्वाला घरात पसरल्याने घरातील लोकांनी तातडीने बाहेर धाव घेतली तसेच पनवेल महापालिकेच्या अग्निशामक दलाला घटनास्थळी प्राचारण करण्यात आले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून साधारण एक तासाभरात आगीवर नियंत्रण मिळविले. या लागलेल्या आगीमध्ये घरातील सर्व सामानाचे मोठे नुकसान झाले आहे. ही आग शॉटसर्किटमुळे लागली असावी, असा प्राथमिक अंदाज अग्निशामक विभागाचे प्रमुख अनिल जाधव यांनी वर्तविला आहे.







**उरण : आमदार महेश बालदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांचा २७ महिने रखडलेला पगारवाढीचा करार करण्यास जेएनपीए प्रशासनास भाग पाडले. त्याबद्दल जेएनपीएतील या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आमदार महेश बालदी यांची भेट घेऊन आभार मानले. या वेळी कामगार नेते सुधीर घरत, सुरेश पाटील यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.**

# 'टाईमपास ३'मध्ये झळकला पनवेलचा जयेश चव्हाण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'दगरूचा बिपी वाढवायला मलेरिया दादूस आयला रं...' असं म्हणत रवी जाधव दिग्दर्शित 'टाईमपास ३' या चित्रपटाचा धम्माल टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आलाय. 'टाईमपास'च्या पहिल्या भागाप्रमाणे तिसऱ्या भागातही अभिनेता जयेश चव्हाण 'मलेरिया'च्या भूमिकेत दिसणार आहे. आपल्या 'गोर गोर आगरी बोलीत' प्रेक्षकांना खळखळून हसवण्यासाठी तो सज्ज झाला आहे. जयेश पनवेलचा रहिवासी आहे.



प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या प्रतिसादाबद्दल जयेशने सांगितले, 'टाईमपास मध्ये मी 'मलेरिया' नावाची आगरी तरूणाची भूमिका साकारली होती. या भूमिकेमुळे मला नवी ओळख मिळाली. पुन्हा ही गाजलेली भूमिका साकारायला मिळतेय हे माझे भाग्यच आहे. पुढे तो म्हणाला, मी कोकणी असूनही लोक मला आगरी समजतात, जिथे जातो तिथे प्रेमाने दादूस बोलतात. माझ्यासाठी ही खूप मोठी कॉम्प्लिमेंट आहे. पहिल्या भागात झळकलेली दगडूच्या मित्रांची गँग पुन्हा आठ वर्षांनी तिसऱ्या भागात दिसणार आहे. त्यामुळे दगडु आणि पालवी यांच्या लव्ह स्टोरीसोबत मित्रांची कॉलेजातील धम्माल यानिमित्ताने अनुभवता येणार आहे. 'पुन्हा जून्या टीमसोबत काम करण्याची संधी मिळाल्याने आम्ही खूप उत्साहित होतो. रिल लाईफप्रमाणे रियल लाईफमध्ये देखील आमची मैत्री घट्ट झाली आहे. याचाच प्रत्यय तुम्हाला चित्रपट पाहताना येईल,' असे जयेश सांगतो. भूमिकेसाठी जयेशने आठ किलो वजन घटवले आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या व्यक्तिरेखेमधील निरागसता जपणे हे माझ्यासाठी खूप मोठे चॅलेंज होते. दिग्दर्शक रवी जाधव आणि लेखक प्रियदर्शन जाधव यांच्यामुळे हे पात्र साकारणे सोपे झाल्याचे त्याने नमूद केले.

# पनवेलमध्ये सुधीर फडके स्वर रजनीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात स्वर्गीय सुधीर फडके अर्थात बाबुजी यांनी स्वरबद्ध केलेल्या सुरेल गाण्यांचा कार्यक्रम झाला. विनीत गोरे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम सादर झाला. या कार्यक्रमाला पनवेलकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात स्वर्गीय सुधीर फडके अर्थात बाबुजी यांच्या २०व्या स्मृतीदिनानिमीत्त सुधीर फडके स्वर रजनी हा बाबुजींनी स्वरबद्ध केलेल्या आणि गाऊन अजरामर केलेल्या सुश्राव्य गितांचा कार्यक्रम शनिवारी (दि. ३०) झाला. या सुरांच्या सोहळ्यामध्ये हृषीकेश रानडे, प्राजक्ता रानडे, अर्चना गोरे, मंदार आपटे यांचा सुरेल आवाजात गिते सादर केली.

या वेळी माजी नगरसेवक प्रथमेश सोमण, माजी नगरसेविका निता माळी, नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, भाजप सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन, भाजप कार्यकर्ते चंद्रकांत मंजुळे, कार्यक्रमाचे व्यवस्थापक मंदार काणे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी देशवासीयांशी मन की बात या कार्यक्रमाद्वारे संवाद साधत असतात. त्या अनुषंगाने भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी लक्ष्मी वसाहत झोपडपट्टीमधील कार्यकर्त्यांसोबत 'मन की बात' अनुभवली. या वेळी तेथील दीपक वाघरी, भावना वाघरी आदी उपस्थित होते.**

# पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**उरण : रामप्रहर वृत्त**

कलासाधना सामाजिक संस्था, नवी मुंबई यांच्या वतीने ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार व राष्ट्रस्तरीय इंडियन आयडॉल स्टार अवॉर्ड २०२२ पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन संस्थेच्या अध्यक्ष मेघा महाजन यांनी केले आहे.

प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारिख २० ऑगस्ट २०२२ असून शिक्षक, प्राध्यापक, क्रिडा, चित्र, शिल्प, नृत्य, गायन राजकारण, समाजकारण, इतिहास, वित्त, प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक्स मिडिया, वैद्यकीय, व्यवसाय, उद्योजक, संशोधन समाजसेवक, कवि, लेखक, कलाकार, पर्यटन, आरोग्य इत्यादी श्रेत्रातील मान्यवर आपले प्रस्ताव पाठवू शकतात. हा पुरस्कार सोहळा सप्टेंबर २०२२ मध्ये होईल. कार्यक्रमाचे आयोजन नवी मुंबई येथे होईल. ८५९१४४१३०३ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर आपले प्रस्ताव पाठवावेत, असे आवाहन कलासाधना सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्रावणी सोमवार विशेष

# उरणचे कळंबूसरेश्वर भाविकांचे श्रद्धास्थान

**उरण : रामप्रहर वृत्त**

शिवमंदिर शेजारी पिंपळ हा अत्यंत दुर्मीळ योगायोग उरण तालुक्यातील पंचक्रोशीत असलेले कळंबूसरे येथेच पहावयास मिळते. हे मंदिर डोंगराच्या सानिध्यात निसर्गरम्य अशा ठिकाणी असून समोर तलाव असल्याने हे मंदिर अधिकच आकर्षक दिसते. श्रावणी सोमवार व महाशिवरात्रीनिमित्त या मंदिरात भाविकांची गर्दी असते, तसेच या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात येते.

आज अस्तित्वात असलेल्या मंदिरात कोणत्याही ठिकाणी काळभैरव पाहावयास मिळत नाही ती मूर्ती फक्त या शिवालयात दृष्टीस पडते. हा काळभैरवरुपी महादेव या कळंबूसरे गावाचे अस्मानी आणि सुलतानी संकटापासून रक्षण करीत आहे. मंदिराभोवतीचा परिसर हा हिरव्यागार वनश्रीने नटलेला असून मंदिराच्या पूर्वेकडे विशाल तलाव आहे, तर पश्चिमेकडून दक्षिणेकडे पसरलेल्या विशाल पर्वत रांगा आणि त्यांच्या पूर्वे





कडील भात खासरे अशा विविध प्रकारच्या वृक्षराजीमुळे या मंदिराची शोभा अधिकच वृद्धिंगत करीत आहे. राजा रवि वर्माने १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात या ठिकाणी कळंबुसरे शहराची स्थापना केली त्यानंतर सुमारे २०० वर्षे हे शिवालय याच ठिकाणी एकटेच होते. गावातील हाताच्या बोटावर मोजण्या इतके लोक दर सोमवारी व श्रावण महिन्यात यथासांग पुजा करीत नंतर गावकऱ्यांनी काळभैरव नंदिकेश्वर व रुद्र हनुमंत यांच्या पाषाणमूर्ती आणून शिवलिंगाच्या जवळ यथा विधीने स्थापना केली.

याचवेळी १७व्या शतकाच्या अखेरीस येथे साधे देवालय उभारले पुढे १९व्या शतकाच्या माध्यमेच्या आसपास पुन्हा पूर्वसुरींनी दगड विटांचे मातीने बांधकाम करून दरवाजा देवालय उभारून पहिला जीर्णोद्धार केला. त्याचवेळी मैदानातील तुळशी वृंदावन बांधले पुढे विसाव्या शतकाच्या मध्यानंतर सन १९६७-६८ साली गावकऱ्यांनी शिवालयाचा दुसरा जीर्णोद्धार केला आणि त्याला आणि आत्ता तब्बल ३८ वर्षानंतर म्हणजे सन २००५ साली आधुनिक पद्धतीचे अतिशय सुंदर असे सुमारे २५ लाख रुपये खर्च या गावातील सुरेश राऊत यांनी तिसरा जिर्णोद्धार केला. गावातील सर्व ग्रामस्थांनी सभा मंडपास हातभार लावला.

कळंबूसरेश्वर खरोखरच साक्षात्कारी शिवभक्तांच्या हाकेला धावणारे मनोरथ पूर्ण करणारे आहे. त्यामुळेच या मंदिरात शिवरात्री च्या दिवशी व श्रावणी सोमवारी भक्तांची दर्शनासाठी रीघ लागलेली असते, अशी माहिती पत्रकार सुनील ठाकूर यांनी दिली.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३०

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती उर्जा कंपनी सरकारी मालकीची नाही?**
***अ.*** एनटीपीसी ***आ.*** पॉवर ग्रीड ***इ.*** गेल ***ई.*** टाटा पॉवर

**२. आपण कर्जदार असाल तर कोणते कर्ज आधी फेडणे फायद्याचे आहे?**
***अ.*** गृह कर्ज ***आ.*** कारवरील कर्ज
***इ.*** क्रेडीट कार्डवर घेतलेले कर्ज ***ई.*** इन्शुरन्स पॉलिसीवर घेतलेले कर्ज

**३. आकाश या नव्याने येणाऱ्या विमान कंपनीच्या स्थापनेत कोणी पुढाकार घेतला आहे?**
***अ.*** नटराजन चंद्रशेखरन ***आ.*** राकेश झुनझुनवाला ***इ.*** रमेश दमाणी ***ई.*** नंदन निलकेणी

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय


# नव्या सरकारचा धडाका


राज्यात सत्तापरिवर्तन होऊन नवे सरकार स्थापन होऊन महिना पूर्ण झाला आहे. आता मंत्रिमंडळ कधी स्थापन होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्या दृष्टीने हालचालीही सुरू आहेत. विरोधकांनी मात्र हा मुद्दा पुढे करीत ओरड चालविली आहे. त्यांना टीका करण्याचा अधिकार जरूर आहे, पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या जोडीने महिनाभरात विकासकामांचा जोरदार धडाका लावत पुढील कारभार कसा असेल याची चुणूक दाखवून दिली आहे.

**शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी राज्यात राजकीय भूकंप घडविल्यानंतर शिवसेना-भाजप युतीचे सरकार पुन्हा अस्तित्त्वात आले आहे. या सरकारमध्ये सध्या मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोघांचाच समावेश असला तरी त्यांनी एकापाठोपाठ एक अनेक निर्णय घेत राज्यातील अडीच वर्षे रखडलेला बॅकलॉग भरून काढण्यास पावले टाकली आहेत. नव्या सरकारने सर्वप्रथम सर्वसामान्यांना दिलासा देत पेट्रोल-डिझेलच्या दरात कपात केली. त्याचप्रमाणे आणीबाणीतील बंदीवास भोगावा लागलेल्यांना पूर्वीप्रमाणेच मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर नामांतर आणि नामकरणाचा विषय अधिकृतपणे मार्गी लावला. मागील सरकारने ते अल्पमतात आल्याने घाईघाईत केवळ श्रेयासाठी औरंगाबादचे संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव असे नामांतर केले. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भूमिपुत्र, कष्टकरी, प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला होता. वास्तविक सत्ता असताना तत्कालीन राज्यकर्त्यांनी याकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष केले होते, मात्र सरकार कोसळतेय असे दिसतात श्रेय मिळविण्यासाठी या विषयांना मंजुरी दिली. नव्या शिंदे-फडणवीस सरकारने हे निर्णय बेकायदा ठरवत ते पुन्हा मंत्रिमंडळ बैठकीत मांडून त्यावर अधिकृतपणे शिक्कामोर्तब केले. जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाला बळ देण्यासाठी विद्यमान सरकार विशेष आग्रही आहे. शेतकऱ्यांसाठी काय काय करता येईल त्या सर्व दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राज्यातील शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय अतिउच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजनेतील शेतकऱ्यांना १ रुपया १६ पैसे प्रति युनिट व स्थिर आकारात २५ रुपये केव्हीए इतकी सवलत कायम ठेवण्यात आली आहे. विद्युत वितरण प्रणालीत मोठ्या प्रमाणात सुधारणा करून वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मिटर देण्यात येणार आहेत. गेली दोन वर्षे कोरोनाचे सावट होते. त्यामुळे दोन वर्षे सण-उत्सवांवरही निर्बंध होते, परंतु आता कोरोनाचा संसर्ग कमी झाल्याने निर्बंध उठवून सणवार धूमधडाक्यात साजरे करण्यास नव्या सरकारने परवानगी दिली आहे. अर्थात, सर्वांना नियम-अटी पाळाव्या लागतील. मराठमोठा सण दहीहंडीला सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आली आहे. एकूणच घरात न बसता रस्त्यावर उतरून काम करणारे मुख्यमंत्री आणि तितकेच मेहनती व व्यासंगी उपमुख्यमंत्री राज्याला मिळाल्याने विकासयात्रा जोरात सुरू झाली आहे. यातून सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न असेल. मंत्रिमंडळ विस्तारानंतर त्यास अधिक वेग येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा विकास व प्रगती आता कुणीही रोखू शकत नाही.**

# कर्जतच्या वर्षा पर्यटनाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष नको

**खबरबात**
**संतोष पेरणे**





मागील २० वर्षात कर्जत तालुका पर्यटन तालुका बनला आहे. या भागातील पावसाळी पर्यटन आणि त्यासाठी आयोजित केलेल्या वर्षा सहली यामुळे या तालुक्याचा व्यापार भरभराटीला आला होता. मात्र प्रशासनाचे अधिकारी आपली जबाबदारी टाळण्यासाठी कर्जतचे पर्यटन संपवू पाहत आहेत असे दिसून येत असल्याचा सातत्याने आरोप होत आहे. अपघात होतात म्हणून वर्षासहली यांच्यासाठी कर्जत तालुक्यातील सर्व पाणवठे यांच्या ठिकाणी जाण्यासाठी जमावबंदी आदेश लागू केले आहेत. दरम्यान यावर्षी जिल्ह्यातील बहुतेक ठिकाणी वर्षासहली यांचा हंगाम जोरात सुरु होता आणि फक्त कर्जत तालुक्याला जमावबंदी होती काय? असा प्रश्न आता सामान्य जनता उपस्थित करू लागली आहे.

कर्जत तालुक्यातील निसर्ग सौंदर्य यांचा आनंद घेण्यासाठी हजारो पर्यटक येत असतात. मात्र धबधबे, धरणे, तलाव या ठिकाणी होणारे अपघात लक्षात घेऊन पावसाळी पर्यटनावर दरवर्षी बंदी घालण्यात येत असते. मागील दोन वर्षे कोरोना मुळे लावलेल्या लॉकडाऊन नंतर आलेल्या पावसाळ्यात पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्याचे प्लॅन सर्वांनी आखले होते. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक कर्जत तालुक्यातील धबधबे किंवा तलावाच्या ठिकाणी येत असतात.

कर्जत तालुक्यातील अवसरे धरण, साळोख धरण, खांडस धरण, पाषाणे धरण, डोंगरपाडा धरण, पाली भूतिवली धरण, बेकरे कोल्हा धबधबा, कोमलवाडी धबधबा, बेडीसगाव धबधबा, टपालवाडी धबधबा, आनंदवाडी धबधबा, नेरळ-जुम्मापट्टी धबधबा, मोहिली धबधबा, वदप धबधबा, आषाणे-कोषाणे धबधबा, पळसदरी धरण व धबधबा, कोंढाणे लेणी-धरण-धबधबा, सोलनपाडा धरण-पाझर तलाव आदी ठिकाणी पर्यटनासाठी पावसाळयात पर्यटक येत असतात.

गेले २०वर्षांपासून मुंबई आणि ठाणे परिसरातील मध्यमवर्गीय यांना कर्जतच्या निसर्गाने भुरळ घातली आहे. त्यावेळी एवढी वाहने उपलब्ध नव्हती आणि त्यामुळे ९० टक्के मध्यमवर्गीय हे उपनगरीय लोकल पकडून शनिवार आणि रविवार तसेच सुटीच्या दिवशी कर्जत, नेरळ, भिवपुरी रोड आणि वांगणी येथील धबधबे, धरणे तसेच तलाव यांच्या ठिकाणी वर्ष सहलीसाठी येत होते. बहुतेक पर्यटक हे कर्जत तालुक्याच्या विविध भागात असलेल्या धबधबे यांच्या ठिकाणी पोहचायचे आणि निसर्गाचा आनंद घेऊन घरी परतायचे. त्यातून कर्जत तालुक्यातील धबधबे यांची माहिती प्रसिद्धी होऊ लागली आणि त्यामुळे कर्जत तालुक्यातील पर्यटन पावसाळ्यात भरभराटीला येऊ लागले. त्यात कर्जत तालुका पर्यटन तालुका म्हणून विकसित होत असताना पावसाळ्यातील चार महिने येथील पर्यटन आणखी खुलायचे आणि त्यामुळे कर्जत तालुका प्रसिद्धीच्या झोतात आला होता. त्यात पर्यटक येऊ लागल्याने धबधबा किंवा धरणे पाझर तलाव यांच्या आजुबाजूला राहणाऱ्या लोकांचा आर्थिकस्तर वाढला होता. पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांकडून बटाटा वड्यापासून मक्याचे कणीसपासून तांदळाच्या भाकऱ्या घरगुती जेवण, शीतपेय यासारख्या वस्तूंची जोरदार विक्री व्हायची आणि त्यातून स्थानिक लोकांचा उदरनिर्वाह चालायचा.

मात्र प्रशासनाने मागील काही वर्षे अपघाताचे कारण पुढे करून कर्जत तालुक्यातील सर्व पाणवठे यांच्या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकावर बंदी घातली आणि त्या त्या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांवर कारवाई करण्याचे जाहीर केले. कलम १४४ लावून जमाव बंदी करणाऱ्यावर कारवाई होणार या भीतीने पर्यटक घाबरु लागले. परिणामी कर्जत तालुक्याच्या पावसाळी पर्यटनावर याचा परिणाम दिसून येऊ लागला.

रायगडच्या काही भागात किंवा शेजारच्या जिल्ह्यात सर्व पर्यटन स्थळावर पावसाळ्यात बंदी आहे तरीदेखील तेथील पर्यटन जोरात सुरु आहे. कर्जत तालुक्यात १० जूनपासून आतापर्यंत कोणालाही फिरकू दिले गेले नाही. त्यामुळे अल्पावधीत प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या सोलनपाडा येथील निसर्ग अनेकांना इच्छा असून पाहता येत नाही. कर्जतकडे पर्यटक येणे कमी झाले आहे आणि आले तर सरळ माथेरान गाठतात. त्यामुळे स्थानिक लहान लहान धबधबे आणि मोठे प्रसिद्ध धबधबेदेखील ओस पडले आहेत.

कर्जत तालुक्यात प्रशासनाने असे निर्बंध लावताना स्थानिक प्रत्येक धबधबा आणि पाणवठे याठिकाणी जाऊन तेथील स्थानिक आणि व्यावसायिक यांच्यासोबत बोलून निर्णय घ्यायला हवा होता अशी सरळसरळ मागणी या दरम्यान झाली होती. तर व्यावसायिक सागर शेळके यांनी प्रशासनाने आपल्या निर्णयाचा विचार करावा आणि पर्यटन सुरु ठेवावे अशी मागणी करणारे निवेदन रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे केले होते.

श्रावण महिना सुरु होईपर्यंत पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात. परंतु बंदी कायम असल्याने व्यावसायीक यांनीदेखील यापूर्वी झालेले नुकसान आणखी होऊ नये यासाठी कोणतीही रिस्क घेतली नाही. निसर्गाने भरभरून कर्जत तालुक्याला दिले आहे. मात्र त्याचा आस्वाद घेण्यास बंदी अशी स्थिती कर्जत तालुक्यातील निसर्ग पर्यटनाची झाली आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.


**पर्यटनावर असे निर्बंध**

गजबजलेल्या पर्यटनस्थळांच्या ठिकाणी व त्यांच्या १ कि.मी. परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) नुसार पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्याच्या परिसरामध्ये मद्यपान करण्यास किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघड्यावर मद्य सेवन करणे, पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, दऱ्यांचे कठडे, धोकादायक वळणे इ. ठिकाणी सेल्फी काढण्यास व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे तसेच रहदारीवर परिणाम करणाऱ्या ठिकाणी फोटोग्राफी करणे, पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या पाण्यात, खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे, धबधब्यावर जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली करणे, सायंकाळी ६ वाजल्यानंतर ते सकाळी ६ वाजेपर्यंत या कालावधीत धबधबे किंवा तलाव या ठिकाणी पाण्यात उतरणे, वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबविणे, वाहन अतिवेगाने चालविणे तसेच वाहतुकीस परिणाम, अडथळा होईल, अशा प्रकारे वाहन चालविणे, वाहनाची ने-आण करण्यावर ही बंदी असेल. याबरोबरच कर्जत प्रांताधिकारी अजित नैराळे यांनी प्रतिबंधात्मक काही आदेश लागू केले आहेत.

दरम्यान, पर्यटनातून येथील लोकांना रोजगार मिळत असतो. कर्जतच्या पर्यटनावर प्रशासन आणि स्थानिकांच्या चर्चेतून याबाबत काही मार्ग काढला जावा अशी मागणीही यादरम्यान होऊ लागली आहे.

# भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे

**निमित्त**



विनोबा भावे यांचे पूर्ण नाव आचार्य विनोबा भावे, म्हणजेच विनायक नरहरी भावे असे होय. त्यांचा जन्म कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गागोदे या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव नरहरी शंभूराव भावे आहे. तर त्यांच्या आईचे नाव रखुमाबाई आहे. ते एक भारतीय स्वातंत्र्यसैनिक व भूदान चळवळीचे प्रणेते होते. आज एक ऑगस्ट या दिवशी त्यांना रॅमन मॅगेसेसे पुरस्कारांने गौरविण्यात आले आहे. यानिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला हा आढावा.

विनोबा भावे यांचे आजोबा शंभूराव हे वाई गावांमध्ये राहत असत. या गावचे रहिवासी होते. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. वाई गावात ब्राह्मणांच्या या मोहल्ल्यात कोटेश्वर मंदिर आहे. हे भावे यांच्या मालकीचे असून तिथे शंभूराजांनी अग्निहोत्र स्वीकारून अग्निहोत्र शाळा स्थापली होती. आजोबा आणि मातोश्रीपासून धर्मपरायण त्याचे संस्कार विनोबांना मिळालेले होते. त्यांचे वडील नरहरी शंभूराव भावे आणि आई रखमाबाई. त्यांचे वडील नोकरीच्या निमित्ताने बडोदे येथे गेले.

विनोबांचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोदा येथेच झाले. १९१६साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईत जाण्यास निघाले, परंतु वाटेतच सुरतेस उतरून आई-वडिलांना न कळवताच वाराणसी येथे गेले. त्यांना दोन गोष्टीचे आकर्षण होते. एक म्हणजे हिमालय व दुसरे बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक वाराणसी येथील हिंदू विश्वविद्यालयातील एका समारंभात महात्मा गांधीजींचे झालेले भाषण झाले. त्या भाषणाचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला.

हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती यांच्या दोन्ही प्रेरणा महात्मा गांधींकडून घेतल्या. त्यांनी महात्मा गांधींशी पत्रव्यवहार केला व गांधीजींची कोचरब येथे आश्रमात ७ जून १९१६ रोजी भेट घेतली. तेथेच त्या सत्याग्रह आश्रमात ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून जीवन साधना सुरू केले. ऑक्टोबर २०१६ मध्ये महात्मा गांधीजी एक वर्षाची रजा घेऊन तेव्हा इथे प्राज्ञ पाठशाळेत वेदांताचे अध्ययन न करता उपस्थित झाले. विद्येची साधना त्यांचा जीवन उद्देश होता.

विनोबा भावे यांचे कार्य या प्रमाणे-गांधीजींचे मोठे भक्त शेठ जमनालाल बजाज यांनी साबरमतीच्या सत्याग्रह आश्रमाची शाखा वर्ध्याला काढली. त्या शाखेचे संचालक म्हणून महात्मा गांधीनी विनोबांची रवानगी वर्ध्याला केली. ८ एप्रिल १९२१ रोजी विनोबा पोहोचले. संपूर्ण आयुष्य १९५१ ते १९७३ पर्यंतची भूदान यात्रा सोडल्यास या वर्ध्याच्या आश्रमात राहून विनोबांनी तपश्चर्या करीत जीवन घालविले. हा वर्ध्याचा आश्रम क्रमाने मगनवाडी बजाजवाडी महिला आश्रम सेवाग्राम व पवनार या ठिकाणी फिरत राहिला. ही सर्व ठिकाणे वर्ध्याच्या आठ किमी परिसरात आहेत. दिवसातले सात-आठ तास सूत कातणे, विणणे आणि शेतीकाम यामध्ये यांनी घालविले. माणसाने दररोज शरीरश्रम करायलाच पाहिजे, हा त्यांचा सिद्धांत आहे. शरीरश्रम आणि निष्ठा हे त्यांचे जीवन तत्त्वज्ञानाप्रमाणे महत्त्वाचे व्रत आहे. श्रमाबरोबरच त्यांनी मानसिक अध्यात्मिक साधनाही प्रखरतेने केली. सन १९३०-१९३२ सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी कारागृह भोगला. १९४० साली महात्मा गांधींनी स्वराज्याकरिता वैयक्तिक सत्याग्रहाचे आंदोलन सुरु केले तेव्हा त्यात पहिला सत्याग्रही म्हणून विनोबा भावे यांची निवड केली. जवाहरलाल नेहरू हे दुसरे निवडले. आपल्या वयाच्या ५५ वर्षांपासुन ते ६८ वर्षांपर्यंत ४० हजार मैल पायी चालत देशातील या महत्वाच्या प्रश्नाला लोकांपर्यंत पोहोचवुन सोडवण्याचा प्रयत्न केला. ग्रामदान, संपत्तीदान अशी आंदोलने चालविली आणि एकीकडे कंचनमुक्ती, ऋषीशेतीसारखे शेतीविषयी प्रयोगदेखील केले आहेत. १५ नोव्हेंबर १९८२ रोजी सकाळी ९.४० वाजता पवनार येथे परमधाम आश्रमाचे सतत सात दिवस प्रयोपेशन करून भूदान नेते आचार्य विनोबा भावे यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. त्यांचा जन्म ११ सप्टेंबर १९९५ मध्ये झाला. विनोबा भावे भूदान चळवळीचे प्रणेते म्हणून आजही सर्वांच्या मनात कायम आहेत.

**क्लिक...क्लिक...!**


(छाया : दिनेश पवार)



**उरण : दोन महिन्यांपासून समुद्रापासून दूर गेलेल्या मच्छीमारांची प्रतीक्षा आता संपली आहे, कारण शासन बंदीनंतर आजपासून मच्छीमारांच्या बोटी मासेमारीसाठी पुन्हा खोल समुद्रात झेपावणार आहेत.**

## बदलते तंत्रज्ञान





### गुगलविषयी अशीही माहिती..

खूप कमी लोकांना माहित आहे की, गुगलचे एक पूर्ण रूप देखील आहे. आज आपण या विषयी जाणून घेणार आहोत. आपल्या दैनंदिन वापरात आपण अनेक शब्दांचे शॉर्टफॉर्म्स म्हणजेच त्यांचे संक्षिप्त रूप वापरतो. काही संक्षिप्त रूपांचे अर्थ आपल्याला माहित असतात. मात्र काही शब्दांचे अर्थ माहीत नसल्याने आपल्याला ते संक्षिप्त रूपच मूळ शब्द वाटतात. असेच काही शब्द म्हणजे यूएसबी, व्हायरस, एलसीडी इत्यादी. हे शब्द आपण आपल्या दैनंदिन आयुष्यात सरहास वापरत असलो तरीही या संक्षिप्त शब्दांचे पूर्ण रूप तुम्हाला कदाचित माहित नसेल. जेव्हा आपण इलेक्ट्रॉनिक दुकानात टीव्ही घेण्यासाठी जातो, तेव्हा आपल्याला अनेक प्रकारचे टीव्ही दाखवले जातात. त्यापैकी एलसीडीदेखील आहे, परंतु तुम्हाला त्याचे पूर्ण रूप नक्कीच माहित नसेल. एलसीडीचे पूर्ण रूप लिक्विड क्रिस्टल डिस्प्ले आहे.

काही कंपन्यांची अशी नावे आहेत, जी फक्त शॉर्ट फॉर्ममध्ये ओळखली जातात, मात्र त्याचे पूर्ण स्वरूप कोणालाच माहीत नाही. आपण दररोज आपल्या स्मार्टफोनवर गुगल वापरतो. जसे की आपणा सर्वांना माहित आहे की, गुगल हे एक सर्च इंजिन आहे. ज्यावर आपण कोणत्याही प्रकारचे प्रश्न सर्च बारमध्ये टाइप करून त्यांची उत्तरे शोधू शकतो. जर तुम्ही वाटत असेल की गुगलचे पूर्ण स्वरूप नाही तर तुम्ही चुकीचे आहात. खूप कमी लोकांना माहित आहे की, गुगलचे एक पूर्ण रूपदेखील आहे, कारण सुरुवातीपासून लोकांनी फक्त गुगल हे नाव ऐकले आहे. आज आपण गुगलचे पूर्ण नाव जाणून घेऊया. सुरुवातीला गुगलचे नाव बॅकरब होते. गणिताचा अभ्यास करणाऱ्या लोकांना माहित असेलच की, शंभर शून्य असलेल्या एकाला गुगल म्हणतात. यावरूनच गुगलला हे नाव देण्यात आले. गुगल सर्च इंजिनच्या माध्यमातून प्रत्येकाला अगणित माहिती मिळावी, अशी यामागची संकल्पना होती. आता गुगलचे पूर्ण रूप जाणून घेऊया. गुगलचे पूर्ण रूप म्हणजे ग्लोबल ऑर्गनायझेशन ऑफ ओरिएंटेड ग्रुप लँग्वेज ऑफ अर्थ असे आहे.

## आरोग्य प्रहर

### डोळ्यांना त्रास होतोय? जाणून घ्या घरगुती उपाय

पंचद्रियांमध्ये डोळे हे एक अतिशय महत्त्वाचे इंद्रिय आहे. असे म्हटले जाते की, दृष्टी असेल तर सृष्टी दिसेल. यासाठी डोळ्याची काळजी घेतली पाहिजे. अलीकडच्या काळात ऑफिसकामाचा ताण वाढत चालला आहे. ऑफिसमध्ये किंवा घरी लॅपटॉप, संगणकावर बसून दिवसभर काम करावे लागते. त्यामुळे सतत आपल्या हातांच्या बोटांना आणि डोळ्यांना त्याचा त्रास होतो. त्याचबरोबर डोळ्यांना लॅपटॉप किंवा संगणक वापरल्यामुळे थकवा जाणवतो आणि डोळे जळजळ करतात. जर हा त्रास होत असेल किंवा तणाव जाणवत असेल तर काही सोप्या घरगुती उपायांचा अवलंब करून होणाऱ्या समस्येपासून काही प्रमाणात सुटका होऊ शकते.



डोळ्यांना अधून मधून आराम देणे गरजेचे असते. काम करत असताना सतत लॅपटॉप किंवा मोबाइलचा वापर करावा लागत असेल तर काम करत असताना थोड्या थोड्या वेळाने ब्रेक घ्या. याने डोळे दुखायचे किंवा जळजळ कमी होईल. तसेच जर डोळे कोरडे होत आहेत असे वाटत असेल तर त्यासाठी आय ड्रॉप्स्चा वापर करता येईल.

टी बॅग आय मास्कचा वापरही करता येईल. डोळ्यांचा थकवा दूर करण्याचा सर्वात सोपा उपाय म्हणजे टी बॅग होय. याचा वापर करण्यासाठी टी बॅग्सच्या पिशव्या काहीवेळ फ्रीजमध्ये ठेवा. फ्रीजमधून काढल्यानंतर बॅग सामान्य पाण्यात बुडवून डोळ्यांवर ठेवा. टी बॅगच्या वापराने डोळ्यांचा थकवा दूर होण्यासोबतच डोळ्याखालील काळ्या वर्तुळाची समस्याही दूर होते. काकडीचे गोल काप करून डोळ्यावर ठेवू शकता. यामुळे डोळे थंड होण्यास मदत होईल. यासोबतच या मास्कमुळे डोळ्यांचा थकवा सहज दूर होईल.

गुलाबपाणीसुध्दा डोळ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. गुलाबपाण्याच्या वापरामुळे डोळ्यांतील कोरडेपणा आणि थकवा येण्याची समस्या सहजपणे दूर होते. यासाठी कापूस किंवा कॉटन पॅड गुलाब पाण्यात बुडवावा आणि काही वेळ डोळ्यांवर ठेवावा. यामुळे डोळ्यांना नक्कीच आराम मिळेल. आयुर्वेदामध्ये अशा बऱ्याच गोष्टी सांगितल्या आहेत. ज्यामुळे आपल्याला काही आजारांवर त्या उपयुक्त ठरत आहेत. तसेच काही सोप्या घरगुती उपायांचा अवलंब करून होणाऱ्या काही शारिरीक समस्येपासून स्वतःची सुटका होऊ शकेल. देण्यात आलेली माहिती ही सामान्य ज्ञानाच्या आधारावर देण्यात आली आहे. यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे.

# आजपासून मासळीचा हंगाम सुरू

## खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी बोटी झाल्या सज्ज

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात सोमवार (दि. १) पासून मासळीचा हंगाम सुरू असल्याने सुमारे ६५० छोट्या-मोठ्या बोटी मासेमारी करण्यसाठी सज्ज झाल्या आहेत. १ जून ते ३१ जुलै हा मासेमारी बंदीचा कालावधी समाप्त झाला आहे. आता पुन्हा नव्याने मासेमारी करण्यासाठी मच्छीमार तयार झाले असून मोठ्या अपेक्षेने नवीन हंगामाची सुरुवात करताना ते दिसत आहेत.

दोन महिन्यांपासून बोटी किनाऱ्याला शाकारून ठेवण्यात आल्या होत्या. आता या बोटींवरील आच्छादलेले मेणकापड अथवा ताडपत्री काढण्यात आली असून बोटीचे इंजिन, रंगरंगोटी, बोटींची पडताळणी, मशिनची स्थिती या सर्व पडताळून बोटी खोल पाण्यात मासेमारीसाठी जाणार आहेत. बोटी पाण्यात जाण्यापूर्वी मासे पकडण्यासाठी जे जाळे असते त्याची तपासणी करून गुंतलेले जाळे व्यवस्थित सोडवले जाते व त्यानंतर बोटीमध्ये ठेवले जाते.

या वर्षी ऐन मे महिन्यात माशांची आवक घटल्यामुळे मे महिन्यातच बोटी किनाऱ्याला शाकारून ठेवण्यात आलेल्या होत्या, परंतु यंदाचा १ ऑगस्टपासून होणारा माशांचा मौसम तरी चांगला जावा व मुबलक मासे मिळावेत या अपेक्षेने मच्छीमार नव्या दमाने खोल समुद्रात जाताना दिसत आहेत. मच्छीमार मागील दोन वर्षांपासून मुबलक मासळी न मिळाल्यामुळे कर्जाचा बोजासुद्धा वाढला आहे. श्रावण महिना सुरू झाला की, पापलेट ही मासळी मोठ्या प्रमाणात मिळत असते. मच्छीमारांना जर पापलेट मोठ्या प्रमाणात मिळाले तर खूप मोठा आर्थिक फायदा मिळून कर्ज कमी होण्यास मदत मिळणार आहे. पापलेट मासळीला खूप चांगला दरसुद्धा मिळत असतो.

### समुद्र शांत राहावा यासाठी प्रार्थना

***याबाबत रायगड जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की, मासळीचा हंगाम सुरू झाला असून समुद्र खूप शांत आहे. समुद्र शांत राहिला तर मासेमारी व्यवस्थित करता येईल व मुबलक मासळी मिळणार आहे. या महिन्यात समुद्र हा खवळलेला असतो, परंतु सध्या समुद्र शांत असल्याने आहे. थोडी भीतीसुद्धा आहे कारण अचानकपणे समुद्रात वादळ निर्माण होण्याची शक्यतासुद्धा वर्तवली जात आहे. असे होऊ नये ही ईश्वरचरणी सर्व मच्छीमार प्रार्थना करीत आहेत.***





# कर्जतमध्ये आक्षेपार्ह फेसबूक पोस्टप्रकरणी तरुणीवर गुन्हा दाखल




**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील कोदिवले गावातील आशा अनंत राणे या तरुणीने आपल्या फेसबूक अकाऊंटवरून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत आक्षेपार्ह पोस्ट केली होती. याबाबत आंबेडकर अनुयायांनी नेरळ पोलीस ठाणे येथे शेकडोंच्या संख्येने जमून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. दरम्यान, त्या तरुणीविरूद्ध समाजात भावना भडकावून वातावरण दूषित करणे आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दुषणे देणेबद्दल गुन्हा दाखल केले आहेत.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील कोदिवले गावात राहणाऱ्या आशा अनंत राणे या तरुणीने आपल्या फेसबूक अकाऊंटवरून २४ जून रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत आक्षेपार्ह पोस्ट केली होती. त्यानंतर ३० जुलै रोजी त्या पोस्टचे स्क्रीन शॉर्ट रायगड जिल्ह्यात व्हायरल झाले. त्यामुळे भावना दुखावलेल्या आंबेडकरी चळवळीमधील कार्यकर्त्यांनी नेरळ तसेच कर्जत पोलीस ठाणे गाठले. त्यावेळी मारुती गायकवाड, राहुल डाळिंबकर, धर्मानंद गायकवाड, धर्मेंद्र मोरे, अ‍ॅड. उत्तम गायकवाड, अरविंद मोरे, सुमित साबळे अशा नेत्यांनी नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यासाठी ठाण मांडले. डिकसळ येथील किशोर गायकवाड यांनी आक्षेपार्ह पोस्ट तयार करून ती सोशल मीडिया वरील अकाऊंट वरून व्हायरल करणाऱ्या आशा अनंत राणे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी तक्रार दिली. त्यावेळी नेरळ पोलीस ठाणे बाहेर ४००हून अधिक लोकांची गर्दी जमली होती.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कर्जतचे पोलीस उपअधीक्षक विजय लगारे यांनी नेरळ पोलीस ठाणे गाठून प्रकरण समजून घेतले. त्यानंतर तरुणीवर अ‍ॅट्रोसिटी अ‍ॅक्टनुसार गुन्हा दाखल करण्याचे आदेश नेरळ पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांना दिले. कर्जत पोलीस ठाणे येथेदेखील याच प्रकारावरून तक्रार देण्यात आली आहे.

# पेणमध्ये इकोफ्रेंडली गणेशोत्सवाचे आयोजन



**पेण : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणस्नेही गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील मूर्तीकार समुदायासह जेएसडब्ल्यू ग्रुपने सहयोग केला आहे. रंग अभिमानाचा या संकल्पनेवर आधारित जेएसडब्ल्यू इकोफ्रेंडली गणेशोत्सवाचे ५ ते ७ ऑगस्टदरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाच्या निमित्ताने यंदाच्या गणेशोत्सवासाठी गणपतीच्या मूर्तींना पर्यावरणस्नेही रंगांनी रंगविण्याबद्दल या मूर्तिकारांमध्ये जेएसडब्ल्यूचे जाणीवजागृती निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

मुंबई, पुणे आणि महाराष्ट्रातील बहुतेक भागात विकल्या जाणाऱ्या गणेशमूर्ती रायगड जिल्ह्यात तयार होतात.

मूर्तिकार समुदायाने तयार केलेल्या गणेशमूर्ती महाराष्ट्र तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्येही लोकप्रिय आहेत. म्हणूनच मोठ्या संख्येने मूर्तिकार राहत असलेले पेण या तालुक्याला गणेशमूर्तींचे निवासस्थान म्हणतात.

दरवर्षी अनंत चतुर्दशीपर्यंत महाराष्ट्रातील तलाव, नद्या आणि समुद्रात अशा लाखो गणेशमूर्तींचे विसर्जन होते. व्हीओसीचे प्रमाण कमी असलेले रंग वापरण्याबाबत सामाजिक जागृती निर्माण करण्याचे आणि समुद्रातील जीवांना असलेला धोका कमी करण्याचे जेएसडब्ल्यू पर्यावरणस्नेही गणेशोत्सवाचे उद्दिष्ट आहे. आपल्या व्यावसायिक कामकाजामध्ये विविध शाश्वत कार्यपद्धतींच्या माध्यमातून जेएसडब्ल्यू ग्रुपचा भर पर्यावरणाच्या संरक्षणावर राहिलेला आहे.

पर्यावरणस्नेही गणेशोत्सवाच्या संकल्पनेचा प्रसार करण्यासाठी या ग्रुपने पेण येतील मूर्तिकार समुदायाशी हातमिळवणी केली आहे. या मूर्तिकारांना जेएसडब्ल्यू पेंट्स वापरण्याची संधी देऊन हे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे.



**कर्जत : पनवेल पोस्ट कार्यालयाचे एएसपी चेतन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली नेरळ सबपोस्ट कार्यालयांतर्गत माणगाव ग्रामपंचायत कार्यालयात सीईएलसी व आधार कार्ड कॅम्प शनिवारी घेण्यात आला. या वेळी माणगाव सरपंच कल्याणी कराळे, उपसरपंच तानाजी टोकरे, ग्रामपंचायत सदस्य शरद देशमुख, तानाजी देशमुख, अशोक खोपडे, गणेश पार्टे आदी उपस्थित होते.**

# मुरूडमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

मुलांना वयाच्या सहाव्या वर्षी शाळेत प्रवेश मिळतो. नवीन जगात मुले पाऊल ठेवतात. या मुलांमध्ये आनंदी वातावरण रहावे त्यांना शाळेत जाताना सर्व नवीन वस्तू मिळाव्यात व शाळेची आवड निर्माण होण्यासाठी अदानी फाउंडेशनच्या वतीने शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



हा कार्यक्रम कुडगाव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत झाला. या वेळी पोलीस उपनिरीक्षक प्रशांत स्वामी, गटशिक्षण अधिकारी नवनाथ साबळे, केंद्रप्रमुख वामन खोपटकर, धामणकर, कुडगावच्या सरपंच प्रमिला मेंदाडकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, अदानी दिघी पोर्टचे सुहास भागवत, सुधाकर तायडे, कुडगाव शाळेचे मुख्याध्यापक मार्कड, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

पोलीस उपनिरीक्षक प्रशांत स्वामी यांनी, मुलांनी जागेपणी स्वप्न बघा, तसेच सतत मेहनत आणि परिश्रम विद्यार्थ्याला यशाचे उंच शिखर गाठण्यास मदत करतात, असे मार्गदर्शन केले. गटशिक्षण अधिकारी साबळे यांनी, हा शाळेचा केंद्रबिंदू असून त्याला घडवण्यासाठी अदानी फाउंडेशनने अतिशय अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना अशा सोबतीची अत्यंत निकडीची गरज असल्याचे सांगितले.

अदानी फाउंडेशनच्या वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे यांनी सीएसआर फंडाच्या माध्यमातून शैक्षणिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती दिली. दिघी, कुडगाव, मणेरी, नानवली, कर्लास यासोबत एकूण आठ प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिलीच्या १५० विद्यार्थ्यांना बॅग व किटचे वाटप करण्यात आले आहे.

# शुभ्रा प्रकल्प ठरतोय कर्णबधिरांना आधार

**कर्जत : बातमीदार**

समाजातील कर्णबधिर मुलांसाठी आणि आदिवासी समाजासाठी काम करण्यासाठी हालिवली गावाच्या परिसरात राजेंद्र वर्तक आणि भाग्यश्री राजेंद्र वर्तक या दाम्पत्याने कर्णबधिर मुलांची सेवा करण्यासाठी प्रकल्प सुरू केला आहे. हा प्रकल्प या कर्णबधिरांचा आधार बनले आहे.

राजेंद्र वर्तक आणि पेशाने शिक्षिका असलेल्या त्यांच्या पत्नी भाग्यश्री वर्तक यांनी कर्णबधिर यांच्यासाठी काम करण्याचा निर्णय घेतला होता.

कर्जत येथे जमीन खरेदी करून प्रकल्प सुरू करणाऱ्या राजेंद्र वर्तक त्यांच्या पश्चात प्रत्यक्षात आणून समाजातील पीडित वर्गाला सोबत घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम करण्याचे सुरू केले. यासोबतच आदिवासी समाजासाठीसुद्धा काम करण्याचा निर्णय घेतला.



मुंबई येथे वास्त्यव्याला असलेल्या वर्तक या आता कर्जतच्या आपल्या कार्याची कर्मभूमी मानलेल्या ठिकाणी रमलेल्या दिसतात.त्यांची सामाजिक कार्याची आस्था आणि आवड यामुळे त्यांनी कर्जत तालुक्याच्या अनेक भागात आपले अनुयायी गोळा केले आहेत.

कर्णबधिर विद्यार्थी हीच माझी शक्ती आहे, माझी ऊर्जा आहे, असे त्या सातत्याने सांगत असतात. आता निराधार महिला, बचत गट यांसाठी काम करण्याचा मनोदय त्यांनी बोलून दाखवला.

राजेंद्र वर्तक यांची अदृश्य साथ आणि कुटुंबाची मदत या सर्वांमुळे त्या आणखी उंच भरारी मारायला तयार आहेत. तालुक्यातील किरवली येथे त्यांनी कार्यशाळा आयोजली होती. या वेळी सुमारे १५० आदिवासी मुलांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता.

किरवली गावातील शाळेमध्ये आदिवासी मुलांची संख्या जास्त असल्यामुळे हा कार्यक्रम किरवली जिल्हा परिषद शाळेत आयोजित करण्यात आला. या वेळी हालीवली, किरवली, उमरोली बामनोली इत्यादी ठिकाणचे आदिवासी विद्यार्थी बोलवण्यात आले होते. आदिवासी मुलांना चित्रकलेच्या साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले, तसेच कंदिल व भेटकार्ड बनविण्यास शिकविले.

या कार्यशाळेच्या माध्यमातून आदिवासी, कर्णबधिर मुलांसाठी नवीन रोजगार निर्मितीसाठी हातभार लावून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे हा उद्देश आहे. सेंद्रिय खत आणि जीवमृत, तसेच कुकुटपालन केंद्र येथील दुर्गंधी नष्ट करणारे औषध त्या ठिकाणी तयार केले गेले.

आदिवासी लोकांनी पिकविलेला भाजीपाला आणि पावसाळ्यात आरोग्यवर्धक असलेल्या रानभाज्यांनादेखील शुभ्रा प्रकल्प बाजारपेठ मिळवून देत आहे. त्यामुळे कर्जत तालुक्याच्या आदिवासी लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

# रायगडातील माळराने रानफुलांनी बहरली

(छाया : सलीम शेख)



**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या दिवसांत रानफुलांना बहर आला असून माळरानावर गवत फुलांचा सडा पसरला आहे. संततधार पडणारा पाऊस, पावसाळ्यातील आल्हाददायक गारवा यामुळे रायगड जिल्ह्यातील माळराने विविध फुलांनी बहरली आहेत.

निसर्ग आणि पर्यावरणाच्या विविधतेने रायगड जिल्ह्यातील जंगल समृद्ध आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर तालुक्यातील माळरानावर, डोंगरावर विविध प्रकारच्या फुले, वनस्पती उगवतात. साधारणतः आषाढ, श्रावण, भाद्रपद महिन्यात विविध रानफुलांना बहर येतो. याच काळात विविध धार्मिक सण असतात. या सणात धार्मिक विधींसाठी याच फुलांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. तेरडा, रानभेंडी, सोनकी, रानआलं, गेंद, मोतीया व कवाली-अग्निफुले इत्यादी फुले मुबलक प्रमाणात माळरानावर बहरत असून अतिशय विहंगम असे दृश्य मालरानावर दिसत आहेत.

पर्यटक निसर्गप्रेमींसाठी ही पर्वणी असून अनेक हौशी निसर्गप्रेमी या माळरानावर भेटी देत आहेत. पान कुसुम (फॉरेस्ट स्पायडर लीली), खाजकांदे, सुवासिक सफेद मूसली, कर्णफुल, फोंडशी, रान हळद, सीतेची वेणी, अंजनी, भारंगी, कुड्याची फुले, कर्टुल्याची फुले, रान दोडगा, शेरवड आदी फुले माळरानावर बहरत आहेत. साधारणतः ५० ते ६० प्रकारची विविध फुले माळरानावर बहरली आहेत.





> **माळरानावर विविध गवत फुले, रानफुले बहरली आहेत. कोकणात रान फुलांचा पावसाळ्यातील बहर हा मोठा ठेवा आहे. विविध रंगांची ही फुले आकर्षक आहेत. अतिशय निसर्ग संपन्न या जंगलांचे संवर्धन व्हावला हवे. या फुलांचा अधिक अभ्यास होणे गरजेचे आहे.**
> **-विलास देगावकर, निसर्गप्रेमी**

> **पावसाळ्यात माळरानावर उगवणाऱ्या वनस्पती व विविध रंगांची फुले ही निसर्गाची किमया आहे. या फुलांचे आयुष्य काही तास ते काही दिवसांचे असते. विशिष्ठ हवामानात ही फुले फुलून येत असल्याने निसर्ग प्रेमींसाठी पर्वणी ठरत आहे.**
> **-हेमंत बारटक्के, निसर्गप्रेमी**


# अलिबागच्या सहाण टेकडीवर वृक्षारोपण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वृक्षारोपणातून प्रदूषण नियंत्रण शक्य आहे, असे प्रतिपादन जनशिक्षण संस्थानच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया यांनी केले.

श्रमदानातून सहाण टेकडी आदिवासीवाडी परिसरात रविवारी (दि. ३१) जनशिक्षण संस्थान रायगड कर्मचाऱ्यांच्या व व्यवस्थापन मंडळाच्या माध्यमातून उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

सर्वप्रथम उपस्थितांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. सर्व ग्रामस्थांनी गाव विकासासाठी वृक्षारोपण करावे, असे आवाहन अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी केले. या वेळी संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, सहान उपसरपंच नरेश वर्तक, नरेन जाधव, प्रा. अविनाश ओक, अ‍ॅड. नीला तुळपुळे, रत्नप्रभा बेल्हेकर, जनशिक्षण संस्थान रायगडचे संचालक विजय कोकणे आदी उपस्थित होते.



**पाहिजेत - संगणक प्रशिक्षक व हार्डवेअर इंजिनिअर**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विभागातील शाखेमध्ये के आय आय टी, सातारा मार्फत खालील प्रमाणे जागा पूर्णपणे हंगामी, कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने, तात्पुरत्या स्वरूपाच्या व तात्पुरत्या कालावधीसाठी (सत्र नुसार) तासिका तत्त्वावरती (CHB), भरावयाच्या आहेत.

**१. संगणक प्रशिक्षक** (Computer Lab Instructors) **(३१५ जागा)** - शै. पात्रता MCA. B.C.S. / B.C.A. / D.C.M. / PGDCA किंवा पदवीधर व १ वर्ष / ६ महिने कालावधीचा शासनमान्य कॉम्प्युटर कोर्स.

**२. हार्डवेअर इंजिनिअर (४ जागा)** - शै. पात्रता MCSA किंवा पदवीधर व शासनमान्य १ वर्ष / २ वर्ष कालावधीचा Hardware Engineering कोर्स. अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज व सविस्तर माहिती www.kiitsatara.blogspot.in या ब्लॉगवरती उपलब्ध आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख १२/०८/२०२२ आहे. संपर्क- ०२१६२-२३६१५१

**मा. संचालक, के.आय.आय.टी., सातारा**

# वाहन परवान्याच्या चाचणीत फसवणूक

## उमेदवारांची परीक्षा देणारे रॅकेट

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पक्का वाहनचालक परवाना काढण्यापूर्वी शिकाऊ चालक परवाना काढण्यासाठी द्यावी लागणारी चाचणी देणारे रॅकेट उघडकीस आले आहे. आरटीओ आवारात एजंटमार्फत चालणाऱ्या या रॅकेटने शेकडो वाहनचालकांची सराव परीक्षा देऊन त्यांना पास केल्याची शक्यता आहे. या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल केला असून, अनेकांना नोटीस बजावली असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी शनिवारी दिली.

वाहनचालकांच्या सोयीसाठी आरटीओची प्रक्रिया ऑनलाइन केली आहे. परंतु, दलालांमार्फत त्याचा उपयोग अपात्र उमेदवारांना पास करून नफा कमवण्यासाठी होत असल्याचे उघड झाले आहे. आरटीओ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष पडताळणीत हा प्रकार उघड झाला असून, याप्रकरणी एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. शिकाऊ वाहनचालक परवाना प्रक्रिया पारदर्शक राबवली जात नसल्याचा संशय परिवहन विभागाला आला होता. त्यानुसार सर्व आरटीओ कार्यालयांना पडताळणीचे सूचित केले होते. त्याद्वारे नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन अधिकारी



हेमांगिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे यांनी सहायक निरीक्षक तुषार कदम यांच्यामार्फत सापळा रचला होता.

त्यामध्ये कदम यांनी दलाल कुलदीप सिंग याच्याकडे जाऊन त्यांच्या सांगलीतल्या मित्राचे आधार कार्ड देऊन त्याचा शिकाऊ वाहन चालक परवाना बनवायचा असल्याचे सांगितले. त्यानुसार सिंग याने १५०० रुपये घेऊन त्या आधारकार्डद्वारे ऑनलाइन नोंदणी करून उमेदवाराने द्यायची असलेली चाचणीदेखील स्वतः देऊन प्रत्यक्षात उपस्थित नसलेल्या उमेदवाराला पास केले. त्यानंतर अशाच प्रकारे परिसरातील इतरही दलाल नव्याने वाहनचालक परवाना काढत असलेल्या व्यक्तीची सराव परीक्षा उत्तीर्ण करून देत असल्याचे उघड झाले. त्यानुसार २२ जुलैला सिंगविरोधात गुन्हा दाखल करून एपीएमसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक माणिक नलावडे यांच्या पथकाने गुप्तरित्या इतरही दलालांकडे अशाच प्रकारे बोगस ग्राहक पाठवले. त्यात बहुतांश दलाल घरबसल्या उमेदवारांना पास करून देत असल्याचे उघड झाले. त्यानुसार पोलिसांमार्फत या सर्वांना नोटिसा बजावल्या आहेत. अनेकांमध्ये वाहतुकीच्या नियमांबाबत अज्ञान असल्याने त्यांना नापास होण्याची भीती असते. त्यामुळे हे दलाल स्वत: लॉगिन करून चाचणी देऊन अर्जदारांना पास करत होते.

**परिवहन विभागाला शंका**

**वर्षानुवर्षे काम करणाऱ्या दलालांना चाचणीचे प्रश्न व त्यांची उत्तरे पाठ झालेली आहेत. यामुळे अवघ्या अर्ध्या ते एक मिनिटात ते उमेदवाराची परीक्षा द्यायचे. इतक्या कमी वेळात चाचणी पूर्ण कशी होतेय? अशी शंका परिवहन विभागाला आल्याने चौकशीचे आदेश दिले होते.**

# लांब पल्ल्याच्या रेल्वेत चोरट्यांचा सुळसुळाट

## चादरी पळवल्या; अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रेल्वेने लांबच्या पल्ल्याच्या गाड्यांमध्ये एसी डब्यात उपलब्ध करून दिलेल्या चादरीदेखील चोरीला जाऊ लागल्याचे प्रकार घडू लागले आहेत. हापा-मडगाव एक्स्प्रेसमध्ये बुधवारी असा प्रकार उघडकीस आला असून, काही दिवसांत २८ चादरी चोरीला गेल्या आहेत. या चादरी प्रवाशांनी पळवल्या की अज्ञात चोरट्याने याचा उलगडा मात्र झालेला नाही. यावरून लांब पल्ल्याच्या रेल्वेत चोरट्यांचा सुळसुळाट सुटल्याचे उघड होत आहे.



लांबच्या पल्ल्याच्या रेल्वेत प्रवाशांचे मोबाइल किंवा इतर महागडा ऐवज चोरीला गेल्याच्या घटना सतत घडत असतात. अशातच रेल्वेतल्या चादरीदेखील चोरीला जाऊ लागल्याचे उघड झाले आहे. लांबच्या मार्गावर धावणाऱ्या रेल्वेत एसी डब्यात प्रवाशांसाठी रेल्वेने चादरी उपलब्ध करून दिल्या आहेत.

रेल्वेचा प्रवास संपल्यानंतर या चादरी एकत्र करून डब्यात ठेवल्या जातात. परंतु, हापा-मडगाव एक्स्प्रेसमधील अशा २८ चादरी गायब असल्याचे रेल्वे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यावरून अज्ञाताने या चादरी चोरल्याची शक्यता वर्तवून पनवेल रेल्वे पोलिसांकडे बुधवारी तक्रार केली आहे. त्याद्वारे १९ हजार रुपये किमतीच्या चादरींच्या चोरीप्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# महात्मा गांधी विद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**उरण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील दिघोडे येथील महात्मा गांधी विद्यालयात शनिवारी (दि. ३०) नवी मुंबईचे सहायक पोलीस निरिक्षक डॉ. विशाल माने यांनी पोलीस दलातील विभागांची माहिती व कायद्याचे पालन या विषयांतर्गत विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

डॉ. माने यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढविण्यासाठी वाचन, लेखन व इंग्रजी विषयाची आवड निर्माण करण्यास सांगितले. आई-वडील व गुरुजनांचा आदर सन्मान करणे, जीवनात ध्येय निश्चित करणे व ते सत्यात उतरविण्याचा प्रयत्न करणे, असा सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आदर्श विद्यार्थी व सुज्ञ नागरिक होण्याचा प्रयत्न करण्याचा उपदेश दिला.

या कार्यक्रमाला विद्यालयाचे प्राचार्य श्री. नाईक, शिक्षक प्रतिनिधी चव्हाण, ज्येष्ठ शिक्षक श्री. पिंपरे, श्री. फल्ले, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. मोकल यांनी केले व उपस्थितांचे आभार श्री. फल्ले यांनी मानले.



# नेरूळ परिसर उजाळणार; भाजपच्या प्रयत्नांना यश

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ गाव प्रभागातील विद्युत पोलवर असणारे दिवे कालबाह्य झाले होते. पूर्ण क्षमतेने प्रकाश देईनासे झाल्यामुळे ते बदलून त्याजागी नवीन स्वरूपाचे एलईडी प्रकाराचे दिवे बसवावेत, अशी मागणी भाजपचे माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे यांनी आयुक्तांकडे केली होती. त्याला यश येऊन नेरूळ गावात नवीन एलईडी दिवे बसवण्यात आले आहेत.

याआधी बसवण्यात आलेल्या दिव्यांचा प्रकाश लख्ख नसल्याने परिसरात काहीसा अंधार येत होता. त्यामुळे तेथे चांगला प्रकाश पडेल आणि अंधाराची समस्या दूर होईल, शिवाय आकर्षक दिवे लागल्यास परिसराला ही एक वेगळी झळाळी मिळेल ह्या हेतूने महापालिकेच्या विद्युत विभागात या संबंधी पाठपुरावा करण्यात आला होता. त्यानुसार शंकर चांगा ठाकूर चौकातील प्रवेशद्वारातील विद्युत पोल आणि पूनम टॉवर ते बांचोली मैदान ह्या मार्गातील पोल वरील दिवे बदलून त्याजागी नवीन डेकोरेटीव्ह विद्युत एलईडी बसवण्यात आले आहे. टप्याटप्यात विभागातील बहुतांश दिवे बदलण्यात येणार आहेत.

# सानपाड्यातील पाणीसमस्या सोडवा

## स्थानिकांची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरात पाऊस पडत आहे. पालिकेच्या धरणांतही समाधानकारक पाऊस पडला आहे, पण सानपाडा परिसरातील रहिवासी अपुऱ्या पाणीपुरवठ्याने त्रस्त आहेत. सानपाडा विभागातील पाण्याची समस्या निकाली काढावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.

सानपाडा विभागात सानपाडा रेल्वे रूळांलगत असलेल्या सानपाडा गाव, गावठाण, गावठाण विस्तार आणि सिडको नोड वसाहतीमध्ये मागील वर्षभरापासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. सानपाडा पाममार्गे असलेल्या मुख्य जलवाहिनीद्वारे येत असलेले मोरबे धरणाचे पाणी अद्यापपर्यंत सानपाडा विभागाला मिळत नसल्याचा आरोपही रहिवाशांनी केला आहे. त्यामुळे या भागात पाणीटंचाई जाणवत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

कमी दाबाने पाणी येत असल्याने नागरिकांना गरजेपुरतेही पाणी मिळत नाही. सानपाडा येथे अनेक रहिवासी इमारती या ठिकाणी उभ्या राहिल्या आहेत. जलकुंभावरून होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर नागरिकांची पाण्याची गरज पूर्ण होत नाही. त्यामुळे सानपाडा कारशेड मार्गे रेल्वे पटरी अंतर्गत उड्डाणपुलालगत मुख्य जलवाहिनीसाठी मार्ग काढला आणि त्यासाठी योग्य ती उपाययोजना केली तर सानपाडा विभागाची पाण्याची तहान पूर्णपणे भागू शकणार आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी पालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्यासमोर समस्या मांडली आहे. पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी नवीन उपाययोजना करण्याची गरज आहे. शिवाय मोरबे धरणाच्या पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीद्वारे या भागाला पाणीपुरवठा करावा, यासाठी पाणीपुरवठा विभागाला आदेश द्यावेत, असेही त्यांनी म्हटले आहे.

# नवी मुंबईत विनर्स ऑन व्हील्स सायक्लोथॉन

**नवी मुंबई : बातमीदार**

हा सार्कोमा जागरूकता महिना असल्याने, भारतातील सर्वोत्तम कर्करोग रुग्णालयांपैकी एक असलेल्या अपोलो कॅन्सर सेंटरद्वारे, विनर्स ऑन व्हील्स नामक सायक्लोथॉन नवी मुंबईमध्ये आयोजित करण्यात आला होता.

या उपक्रमाचा उद्देश्य सार्कोमा कर्करोगावर जागरूकता निर्माण करणे आणि जागरूकता निर्माण करण्यासह कर्करोगाच्या उपचारानंतरच्या चांगल्या आयुष्याबद्दल सकारात्मकता निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हा होता. कर्करोगाचा रुग्ण योग्य उपचारानंतर यशस्वी आयुष्य कसे जगू शकतो, हे दाखविण्याकरिता स्वेच्छेने रुग्ण साय्क्लोथॉनमध्ये अपोलोचे ब्रॅन्ड अम्बॅसॅडर




म्हणून सहभागी झाले होते. प्रादेशिक सायक्लोथॉन ही पाच शहरांतून आयोजित केली जाईल. बेंगलुरू, हैद्राबाद, नवी दिल्ली आणि चेन्नई आणि सार्कोमा कर्करोग आणि त्याच्या लक्षणांवरदेखील जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

अपोलो कॅन्सर सेंटरच्या ऑन्कोलॉजी समूहाच्या क्लिनिशीयन्सद्वारे या कार्यक्रमास हिरवा झेंडा दिला. डॉक्टर्स आणि वैद्यकिय कर्मचारी संतोष मराठे, प्रादेशिक सीईओ पश्चिम विभाग, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई, डॉ. अनील डी'क्रुझ, संचालक, ऑन्कोलॉजी सर्व्हिसेस, अपोलो कॅन्सर सेंटर्स आणि डॉ. मिशिल पारिख, चिकित्सक, ऑर्थोपेडिक ऑन्कोलॉजी, अपोलो सेंटर्स हे या कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित होते. एव्हरेस्टे सायकलिंग कल्चरचे सायकलिस्ट आणि स्थानिक शाळांमधील मुलेदेखील या कार्यक्रमास उपस्थित होते.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ कर्तबगार महिलांचा गौरव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारताच्या स्वातंत्रप्राप्तीच्या ७५व्या वर्षानिमित्त देशभर आझादी का अमृत महोत्सव हा उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. त्याचाच भाग म्हणून संपूर्ण महाराष्ट्रातून सामाजिक, प्रशासकीय, शैक्षणिक, क्रीडा, पत्रकारिता, आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या ७५ कर्तबगार महिलांच्या कार्याचा गौरव व सन्मान या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आला.

एसएस सिनेव्हिजन यांच्या माध्यमातून आणि रसायनी (मोहोपाडा) मायभूमी असणारे सिने निर्माता दिग्दर्शक सिकंदर सय्यद यांच्या अभिनव कल्पनेतून तसेच आदम सय्यद, नीता कौल यांच्या अथक परिश्रमातून मर्दानी महाराष्ट्राची या राज्यस्तरीय पुरस्काराचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले होते.

प्रशासकीय, चित्रपट, शैक्षणिक क्षेत्रात नावाजलेले मान्यवर या सन्मान सोहळ्याचे प्रमुख पाहुणे होते. लेडी सिंगम एसीपी सुरेखा कपिले, एसीवी आर. एन. राजे, पुणे मनपा सहाय्यक आयुक्त वैभव कडलक, डेप्युटी कमिश्नर एम्प्लॉयमेंट ॲण्ड स्किल डेव्हलोपमेंट अनुपमा पवार, स्टेट लैंड रिकॉर्ड कमीशनर डी. एल. घोडके, मराठी चित्रपट महामंडळ अध्यक्ष मेघराज राजे भोसल, अभिनेत्री पूजा पवार, झेडा फेम पार्श्वगायक ज्ञानेश्वर मेश्राम, संगीत दिगदर्शक हमायूँ कबीर, प्रसिद्ध हिंदी सिनेमा आणी सीरियलचे दिगदर्शक अरशद खान, दूरदर्शन व आकाशवाणीचे सहायक संचालक, इंद्रजीत बागल, मराठी सेंसर बोर्ड सदस्य महेश थोरवे या दिग्गज मान्यवरांच्या हस्ते या ७५ कर्तबगार महिलांचा मेडल, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी महाराष्ट्र राज्य होमगार्ड उप संचालक कल्पना कपिले यांचा विशेष सन्मान करण्यात आला.



# देशी सफरचंद बाजारात उपलब्ध



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून बाजारात देशी सफरचंदांची आवक सुरू झाली आहे. त्यामुळे बाजारात आता बऱ्यापैकी भारतीय सफरचंदांची उपलब्धता दिसत असून चढे दरही आवाक्यात आले आहेत. त्यामुळे सर्वांनाच सफरचंदाची गोडी चाखता येणार आहे.

सामान्यत: ऑगस्ट महिन्यापासून देशी सफरचंदांचा हंगाम सुरू होतो. त्यानंतर मुंबईच्या बाजारात त्यांची आवक होण्यास सुरुवात होते, मात्र या वेळी जुलैमध्येच वाशीच्या घाऊक बाजारात देशी सफरचंद दिसत आहेत. आतापर्यंत २०० रुपये किलोच्या घरात असलेले सफरचंदाचे दर यामुळे आता अगदी १०० रुपयांपर्यंत आले आहेत.

बहुगुणी सफरचंद आजारी व्यक्तींसाठी, लहान मुलांसाठी वरदानच असते. बाजारात पूर्ण वर्षभर ही फळे दिसत असली, तरी वर्षातील आठ महिने परदेशातील सफरचंद बाजारात उपलब्ध असतात. त्यामुळे त्यांचे दर वर्षभर चढेच असतात, मात्र ऑगस्ट ते डिसेंबरपर्यंत भारतीय सफरचंदांचा हंगाम असल्याने या काळात देशातून मोठ्या प्रमाणात सफरचंदे मुंबईच्या बाजारात उपलब्ध होतात. त्यांचा वाहतूक खर्च कमी होतो आणि आवकही मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे साहजिकच त्यांच्या दरात घसरण होऊन ते सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतात. आता मुंबईच्या घाऊक फळ बाजारात देशी सफरचंदांचे आगमन होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे त्यांचे दरही कमी होऊ लागले आहेत. सध्या घाऊक बाजारात शिमला सफरचंदाची १५ ते २० किलोची पेटी चार हजारापर्यंत आहे. त्यामुळे किरकोळ बाजारात सफरचंद १०० रुपये किलोपर्यंत उपलब्ध आहेत, अशी माहिती व्यापारी रामबशिष्ट जयस्वाल यांनी दिली.

परदेशी सफरचंदे कोल्ड स्टोरेजमध्ये साठवून, वर्षभर पुरवली जातात. त्यामुळे त्यांच्या चवीत फरक पडतो. भारतीय सफरचंदांच्या मानाने त्यांचे दरही अधिक असतात, मात्र आता भारतीय सफरचंद बाजारात उपलब्ध झाल्याने परदेशी सफरचंदाचे दरही खाली आले आहेत. किलोमागे २०० रुपयांपर्यंत पोहचलेली ही सफरचंदे १२० ते १३० रुपये किलोपर्यंत खाली आली आहेत.

# सेंट जोहान्स स्कूलमध्ये कारगिल विजय दिन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**


सेंट जोहान्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला बिलीव्हर्स ईस्टर्न चर्च डायोसीजचे बिशप 'हिज ग्रेस मार्टिन मोर अप्रम' प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमाला उपस्थित होते.

सेंट जोहान्स इंटरनॅशनल स्कूलचे व्यवस्थापक फादर संकेत मसिह व प्राचार्य सुसान थॉमस यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात फादर संकेत ख्रिस्त यांनी निर्माते देव पित्याला प्रार्थना करून केली, त्यानंतर कारगिल युद्धात शहीद झालेल्या आपल्या भारतातील सर्व योद्धांचे स्मरण करून दीपप्रज्वलन करून आणि मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर जोहान्स इंटरनॅशनल स्कूलच्या मुलांनी नृत्य केले.



या वेळी माधवी रोहेकर आणि इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी अनुराग गायकवाड यांचे संक्षिप्त भाषण झाले. पूर्ण बिशप 'हिज ग्रेस मार्टिन मोर अप्रेम' यांच्या जय भारत, जय हिंद आणि प्रार्थनाने कार्यक्रमाची सांगता झाली आणि कारगिल युद्धातील त्यांच्या बलिदानाची कहाणी सांगून शहीदांच्या बलिदानाचे स्मरण केले. भाई महेश रावत, जयेश परमार, बिजू वर्गीस, रमेश वळवी व शाळेतील शिक्षकांच्या सहकार्याने हा कार्यक्रम झाला.

या उपक्रमात सेंट जॉन इंटरनॅशनल स्कूल, कोळखे, नवी मुंबई येथील सर्व मुलांनी सहभाग घेतला. शोचे सूत्रसंचालन ओलिव्हिया आणि सूरज यांनी केले होते.



# मुरूड शासकीय विश्रामगृहाची दुरवस्था

## ■ मागील तीन वर्षांपासून वास्तू रिकामीच

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड हे पर्यटनस्थळ असून येथे मंत्रालयातील अनेक मान्यवर तसेच शासकीय अधिकाऱ्यांची ये-जा सुरू असते, परंतु शासनाने बांधलेल्या शासकीय विश्रामगृहाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने अधिकारी वर्गाला खासगी लॉजिंगमध्ये आसरा घ्यावा लागत आहे.

कोविड १९पासून मुरूडच्या शासकीय विश्रामगृहाचा ताबा ग्रामीण रुग्णालयाने घेतला होता. कोरोनाच्या रुग्णांना इलाज करण्यासाठी विश्रामगृह वापरात आणले जात होते, परंतु आता कोरोना रुग्णसंख्या कमी झाली असतानासुद्धा मुरूड येथील सार्वजनिक बांधकाम खात्यास जाग येत नसून हे विश्रामगृह बंद स्थितीतच ठेवण्यात आले आहे. मागील तीन वर्षांपेक्षा जास्त काळ हे विश्रामगृह बंद असल्याने त्याची मोठ्या



प्रमाणात दुरवस्था झाली आहे.

मुरूडला भेटी देणारे मंत्री, लोकप्रतिनिधींना खासगी इमारतीमध्ये कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घ्याव्या लागत आहेत. समुद्रकिनारी असणारे शासकीय विश्रामगृह सर्वांना आवडीचे व राहण्याची उत्तम व्यवस्था असणारे ठिकाण असूनदेखील या विश्रामगृहाच्या डागडुजीकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.

या विश्रामगृहात अजूनही रुग्णालयातील लोखंडी खाटा व इतर सामानसुद्धा हटवण्यात आले नाही. त्यामुळे या विश्रामगृहात अडगळ वाढली असून सर्व रूमची दुरवस्था झाली आहे.

**निधीची आवश्यकता**


*मुरूड सार्वजनिक बांधकाम खात्याचे उपअभियंता गोरे यांना विचारणा केली असता, विश्रामगृह कोविड १९साठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ताब्यात आहे. ज्यावेळी रुग्णसंख्या वाढत होती त्यावेळी रुग्णांची सुविधा या विश्रामगृहात करण्यात आली होती. अजूनपर्यंत याचा ताबा आम्हाला देण्यात आलेला नाही. जरी ताब्यात दिले तरी या विश्रामगृहाच्या दुरुस्तीसाठी निधीची आवश्यकता भासणार आहे. दुरुस्ती झाल्यावरच याचा वापर करता येईल.*

# मजरे जांभूळपाड्यातील विहिरीत पडून तरुणाचा मृत्यू

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील मजरे जांभूळपाडा येथील शेतात असलेल्या एका विहिरीत गुरे चारण्यासाठी गेलेला तरुण हातपाय धुण्यासाठी गेला असता तोल गेल्याने ३० ते ३५ फूट खोल विहिरीत पडला व त्याचा मृत्यू झाला. केशव रवींद्र मालुसरे (१८) असे विहिरीत बुडून मृत झालेल्या तरुणाचे नाव आहे. एका तासानंतर या तरुणाचा मृतदेह बाहेर काढण्यात येश आले.

घटनेची माहिती मिळताच पाली पोलीस, कोलाड रिव्हर राफ्टिंगचे प्रमुख महेश सानप व त्यांचे सहकारी हरेश सानप, अमित जाधव, रोशन सानप, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी धावून जाणारे गुरुनाथ साठीलकर,



विजय भोसले, अमोल कदम, निलेश कुदळे, अंकुश मोरे, भक्ती साठेलकर, विशाल चव्हाण, विवेक रावळ ही टीम घटनास्थळी पोहचली. विहिरीचा घेरा लहान असल्याने एका तासाने तरुणाचा मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. पाली सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार, पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी धोकादायक विहिरींबाबत उपाययोजना करण्यासंदर्भात ग्रामपंचायतीला आवश्यक त्या सूचना देणार असल्याचे सांगितले.

भविष्यात विहिरीत पडून होणाऱ्या घटना टाळण्यासाठी व सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होऊ लागली. यावर चिवे सरपंच अनिता रोहिदास साजेकर यांनी मजरे जांभूळपाडा येथील शेतात उघड्यावर असलेल्या विहिरीला संरक्षक जाळी बसविणार असल्याचे सांगितले.

# पावसाने दडी मारल्याने शेतकरीवर्ग चिंतातुर

## कडक उन्हामुळे भातरोपे करपण्याची भीती

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मागील आठ दिवसांपासून श्रीवर्धन तालुक्यामध्ये पावसाने दडी मारली आहे. कडक ऊन पडत आहे. उन्हाच्या झळा एवढ्या तीव्र आहेत की, उन्हाळ्याच्या दिवसांप्रमाणे उष्मा जाणवत आहे. जुलै महिना सुरू झाल्यानंतर पावसाची सुरुवात चांगली झाली होती, परंतु गेल्या आठ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने नुकतीच लावणी केलेले शेतकरी चिंतेत आहेत.




जुलै महिन्यात पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांनी भातलावणीच्या कामाला सुरुवात केली होती. भाताची लावणी केली त्यावेळी शेतामध्ये थोडेफार पाणी व चिखल होता, परंतु पाऊस पूर्णपणे थांबल्याने व कडक ऊन पडत असल्याने लावणी झालेल्या भातरोपांना खताचा डोस देता येत नाही. त्यामुळे भाताचे वाढण्याचे प्रमाण कमी होणार आहे. त्यातच पुढील चार दिवसात पाऊस पडला नाही आणि शेतातील मातीला भेगा पडल्या तर केलेली लावणी वाया जाईल की, काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

# नेरळ रेल्वेस्थानकातील उद्‌वाहन यंत्रणा कार्यान्वित

**कर्जत : बातमीदार, प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या कर्जत एंडकडील नेरळ जंक्शन रेल्वेस्थानकातील प्रवाशांच्या सेवेत आली आहे. अनेक महिने रखडलेल्या नेरळ स्थानकातील उद्‌वाहनबद्दल स्थानिक प्रवासी संघटना पाठपुरावा करीत होती. अखेर हे उदवाहन सुरू करण्यात आले आहे.

मध्य रेल्वेच्या नेरळ जंक्शन स्थानकात मुंबई दिशेकडे पादचारी पुलाला उदवाहन बसविले गेले आहे, मात्र अनेक महिने लोटले तरी हे बांधलेले उद्‌वाहन प्रवासी वर्गाच्या सेवेत येत नव्हते. त्यामुळे स्थानकात उदवाहन व्हावे यासाठी प्रयत्न करणारे मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी स्थानिक प्रशासनाला उद्‌वाहन तत्काळ सुरू करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर ३१ जुलैपासून नेरळ रेल्वे स्थानकातील उद्‌वाहन कार्यान्वित झाली आहे. त्याबद्दल नेरळ प्रवासी संघटनेने मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांचे आभार मानले आहे.





दुसरीकडे नेरळ स्थानकात फलाट दोन वर उद्‌वाहन सुरू झाल्याने प्रवासी वर्गाने समाधान मानले आहेत. त्यानंतर आता नेरळ प्रवासी संघटनेने स्थानकातील कर्जत एंडकडे मंजूर असलेला सरकता जिना बसविण्याची मागणी अध्यक्ष संदीप म्हसकर तसेच राजेश गायकवाड, मिलिंद विरले, आबा पवार या पदाधिकारी यांनी केली आहे.

# लोकशाही दिनी होणार महिलांच्या समस्यांचे निराकरण


**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात जिल्हा व तालुकास्तरावर लोकशाही दिनी महिलांच्या समस्यांचे निराकरण होणार आहे. सर्व स्तरांतील समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा, या दृष्टीने हा उपक्रम हाती घेतला आहे.

जिल्हास्तरावर प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तालुकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या सोमवारी तहसील कार्यालयात सकाळी ११ वाजता किंवा या दिवशी सुट्टी आल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी या दिनाचे आयोजन केले जाणार आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रासह दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.

अर्जाची आगावू प्रत महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर पाठविणे आवश्यक आहे. या दिनात न्यायप्रविष्ट प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवाविषयक किंवा आस्थापनाविषयक बाबी, तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरूपाची नसेल, तर ते महिला लोकशाही दिनात स्वीकारले जाणार नाही. अधिक माहितीसाठी जिल्हा परिविक्षा अधिकारी शकुंतला वाघमारे यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले.

## निवडक



### भुवनेश्वर मंदिरात महारूद्राभिषेक सोहळा

**खारेपाट** : अलिबाग तालुक्यातील प्रसिद्ध तिर्थक्षेत्र श्री भुवनेश्वर मंदिर येथे महारुद्राभिषेक सोहळा मोठ्या भक्तीभावात झाला. सोहळ्याला सर्व स्तरातील भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या वेळी प्रमुख पाहुणे सतिश वाळके व परिवार यांनी भुवनेश्वर येथे मंदिरात शिवलिंगाला चांदीचे लेपण केले. महारुद्राभिषेकानंतर सर्व भाविकांसाठी तीर्थप्रसादाची सोय करण्यात आली होती. त्याचप्रमाणे या वेळी धार्मिक कार्यक्रमही झाले.



### गुजराती समाज अध्यक्षपदी विलास गुजर

**रोहे** : नुकत्याच झालेल्या गुजराती समाजाच्या बैठकीत व्यापारी विलास गुजर यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या वेळी माजी नगरसेवक महेंद्र गुजर, ज्येष्ठ नेते जगदीश दामणी, मितेश कल्याणी, धिदेश शाह, परेश दामानी, आशिष शाह, बाबु शाह, भावसार बधू, भावेश दामनी, राजू शहा, राकेश पटेल, अमित पटेल, विपुल शहा, माजी अध्यक्ष मिलन शहा, अमित गुजर, सुरेश मेहता, तपण दिवान, भानुषाली बंधू आदी उपस्थित होते. कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष भावेश दमाणी, सेक्रेटरी तपन दिवाण, खजिनदार बाबुभाई शहा, सहसेक्रेटरी मनिष शहा, सहखजिनदार सुरेर्श मेथा यांची निवड झाली.

### पावसाच्या विश्रांतीनंतर उष्णतेत वाढ

**अलिबाग** : गेल्या काही दिवसांपासून अलिबाग परिसरात पावसाले दडी मारल्याने उष्णतेत काही प्रमाणात वाढ झाली असून नागरिक हैराण झाले आहेत. ग्रामीण भागात तुरळक सरी कोसळत असल्या तरीदेखील हवेतील गारवा कमी झाला आहे. सद्यस्थितीत उन्हाळ्याचा अनुभव नागरिकांना येत आहे.

# आयुर्वेद म्हणजे भारतीयांची खरी ओळख –सुरेखा भणगे

## ■ आरोग्य शिबिरात २०० जणांची तपासणी

**कर्जत : प्रतिनिधी**

आयुर्वेद हे प्राचीन काळापासून आहे. आयुर्वेदाच्या उपचाराने रोग मुळापासून निघून जातो. खरेतर आयुर्वेद ही भारतीयांची खरी ओळख आहे. ग्रामीण भागात गावांच्या आजूबाजूलाच वनौषधी आहेत, मात्र त्या तेथील लोकांना माहित नसतात. त्याची माहिती त्यांना करून दिल्यास अनेक व्याधींची मुक्ती होईल, असा विश्वास कर्जत व माथेरान नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी व्यक्त केला.

कर्जत प्रेस क्लबच्या वतीने स्व. निर्मला देशमुख यांच्या स्मरणार्थ तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिर आणि मोफत औषधे वाटप करण्यात आले. या शिबिराला ज्योविस आयुर्वेद दादर मुंबईचे विशेष सहकार्य लाभले होते. हे शिबिर पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठामध्ये झाले. सुरेखा भणगे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे डॉ. मनोहर साबणे, ज्योविस आयुर्वेदाचे डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, रुग्ण सन्मित्र यशवंत गोरे, तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, डॉ. सोनाली



घाणेकर, अस्मिता सावंत, अ‍ॅड. राजेंद्र निगुडकर, महेंद्र निगुडकर आदी उपस्थित होते. डॉ. मनोहर साबणे यांनी, मी जरी अ‍ॅलोपॅथी पद्धतीने उपचार करीत असलो तरी आयुर्वेदिक उपचार पद्धती श्रेष्ठ आहे. आजार होऊ नये यासाठी आयुर्वेद उत्तम आहे. त्याचा प्रसार करणे आवश्यक आहे. असे सांगितले. या शिबिरात ज्योविस आयुर्वेदाच्या २० जणांच्या टीमने सुमारे २०० जणांची तपासणी करण्यात आली.

या वेळी माजी नगराध्यक्ष सुनंदा कांगणे, श्री महालक्ष्मी देवस्थानचे अध्यक्ष रंजन दातार, मनीषा सुर्वे, ज्योती पाटील, पूजा सुर्वे, नितीन दगडे, तानाजी पाटील, अजय गायकवाड, ज्ञानेश्वर बागडे, भूषण प्रधान, पद्मजा देशमुख आदी उपस्थित होते.

# गणेशमूर्ती कार्यशाळेत कारागिरांची लगबग


**रेवदंडा : प्रतिनिधी**

गणेशोत्सव महिन्याभरावर येऊन ठेपल्याने श्रीगणेश कार्यशाळेत मूर्ती कारागिरांची लगबग वाढली आहे, श्रीगणेश कार्यशाळेत माती काम, रंगकाम व आखणी या कामात कारागीर मग्न झाले असून दिवस व रात्र कामे सुरू असलेली दिसून येतात.

आराध्यदैवत श्री गणरायाची मूर्ती बनविण्याचे कसबी कारागीर कार्यशाळेत काम करीत आहेत, विविध रूपातील श्रीगणेशमूर्ती साकारताना नाविन्याला प्राधान्य दिले जाते. कार्यशाळेत दीड, दोन, तिन, चार, पाच, सहा फुटी उंचीच्या



श्रीगणेशमूर्ती कारागीर घडवित आहे. अलिबाग व मुरूड तालुक्यात श्रीगणेश कार्यशाळेत शाडू मातीच्या मूर्तीची मागणी भक्त मंडळी करतात, त्यामुळे शाडू मातीपासून घडविलेल्या मूर्ती ठिकठिकाणी कार्यशाळेत दिसून येतात. रेवदंडा येथील पुजा आर्ट श्रीगणेश कार्यशाळेतील नंदकुमार चुनेकर यांचेशी संपर्क साधला असता, कार्यशाळेत कुशल व कसबी कारागिरांची समस्या असून युवा वर्ग मूर्ती घडविण्याचे कला आत्मसात करीत नसल्याची खंत व्यक्त केली, तसेच प्रतिवर्षी रंग, माती आदीचे वाढते दर यामुळे मूर्तीच्या किंमतीत नाईलाजाने वाढ करावी लागते. सध्या कार्यशाळेत कामाची लगबग सुरू आहे, असे म्हटले.



# देवकुंड धबधबा पर्यटनस्थळ म्हणून विकसित करा

**माणगाव : प्रतिनिधी**

सह्याद्रीच्या खोऱ्यात निसर्गाच्या सान्निध्यात असलेले निसर्गरम्य ठिकाण म्हणजे माणगाव तालुक्यातील देवकुंड धबधबा. कुंडलिका नदीचे उगमस्थान देवकुंड धबधबा आहे. पाटणूस पंचक्रोषीतील विठ्ठल नगर भिरा येथून देवकुंड धबधबा येथे जाण्यासाठी साधारण चार किमी. पायवाट आहे. पायवाट अतिशय खडतर पण मनोरंजक आहे. वाटेवर हलके पाण्याचे ओढे पर्यटकांना भुरळ पाडतात. या वाटेवर हलके पाण्याचे ओढे पर्यटकांना आकर्षित करतात. रोजच्या या धबधब्याचे वैशिष्ट्य म्हणजे वर्षभर वाहणारा धबधबा म्हणून याची ओळख आहे. या स्थळाला शासनाने पर्यटनाचा दर्जा देऊन पर्यटनस्थळ म्हणून घोषित करावे, अशी मागणी स्वराज्य संघटना तथा बौद्ध धम्म संघटनेचे संस्थापक पंकज तांबे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनातून केली आहे.

देवकुंडच्या चार किमी अंतरावर येणारी वळणे, खोलीचा भाग, पाण्याच्या प्रवाहाचा ठिकाणी असणारे धोकादायक ठिकाणे, दरीचा भाग या ठिकाणी रस्त्याचे नियोजन करणे गरजेचे आहे, तसेच ओहोळ व नदी या ठिकाणी पूल उभारावेत जेणेकरून सर्व वयोगटातील पर्यटकांना धबधब्यापर्यंत जाण्यासाठी सोयीस्कर मार्ग तयार होईल. देवकुंड धबधब्याकडे जाणाऱ्या मार्गात प्रत्येकी २५ मी. अंतरावर दिशादर्शक चिन्हे, रेडियम लावण्यात यावेत. जेणेकरून येणाऱ्या पर्यटकांना चुकण्याचे कारण राहणार नाही, तसेच एक किमी. अंतरावर जागोजागी फलक लावण्यात यावेत. धब्याधब्याकडे जाणारे पर्यायी मार्ग दोन आहेत. पावसाळ्यात त्यापैकी ओढे असलेला मार्ग बंद ठेवावा तसेच जो ओढा धोकादायक वाटतो त्या ठिकाणी साकव अथवा पक्का पूल तयार करावा. पर्यटकांसोबत गाईड असणेही आवश्यक आहे. कारण जास्त पाऊस आल्यानंतर ओढे धोक्याची पातळी ओलांडतात अशावेळी गाईडच्या सूचना पाळल्यास सुरक्षितता लाभेल.

पर्यटकांची ग्रामपंचायत पाटणूस कर्मचारी बुथवर नावनोंदणी करीत असतात, पण काही जण गर्दीचा फायदा घेत नोंदणी न करता बुथवरील कर्मचाऱ्यांची नजर चुकवून प्रवेश करतात. तेथे बुथवर आपत्कालीन फोन नंबर दिला जातो. कारण पर्यटकांना काही अडचण आल्यास बुथवर कॉल केल्यास पर्यटकांना वेळीच मदत करण्यात येते. प्रवेश बुथ केंद्रावर प्रथमोपचारची व्यवस्था, तसेच डॉक्टर ऑन कॉल, स्टेचर व रुग्णवाहिकेची व्यवस्था करणे ही प्रशासनाची जबाबदारी असून दरवर्षी संभाव्य दूरघटना घटना टाळता येतील, तसेच पर्यटकांना शासनामार्फत सुरक्षितता पुरवावी. प्रषासनाने या सर्व सुविधांसोबत आवश्यक त्या ठिकाणी साकव, निसरड्या पायवाटेला सुरक्षित कठडे या सोयी पुरविल्यास देवकुंड धबधब्याचा आनंद पर्यटकांना घेता येईल, असे निवेदनात नमूद केले आहे.

**स्वराज्य संघटनेने वेधले लक्ष**



# पनवेलमध्ये राज्यस्तरीय कुंग-फू स्पर्धा

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले स्पर्धकांना प्रोत्साहित





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील तालुका क्रीडा संकुलात सातव्या महाराष्ट्र कुंग-फू राज्यस्तरीय स्पर्धा रविवारी (दि. ३१) आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांमधील सुमारे २०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी या स्पर्धेला भेट देत स्पर्धकांना प्रोत्साहित केले.

कुंग-फू स्पोर्ट्स असोसिएशन नवी मुंबईच्या वतीने आणि महाराष्ट्र कुंग-फू स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने सातव्या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत कोल्हापूर, पुणे, ठाणे, रायगड, नांदेड, सांगली, नाशिकसह इतर जिल्ह्यांतील सुमारे २०० स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धा ६, ९, ११, १४, १७, १९, २५ वर्षाखालील आणि २५ वर्षावरील खुल्या गटात खेळवण्यात आली.

या स्पर्धेला ऑल इंडिया कुंग-फू फेडरेशनचे अध्यक्ष सी. एल. लामा, कुंग-फू स्पोर्ट्स महाराष्ट्र असोसिएशनचे गेनेराल सेक्रेटरी विवेक द्विवेदी, अध्यक्ष सुनील तावडे, सुरज नाईक, ओमकार पवाड, अजय बुंदेला, विश्वास ठाकर, योगेश वेताल, कमल कोठारी, मंगेश पाटील, सचिन पाटील, संदीप कुंजीर, जयदीप तांडेल, सुनील खंडागळे, उमेश कोल्हे, वृषभ जाधव, लीना वेंगुर्लेकर, अजिंक्य लव्हे, इरसार शेख, राजीव पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'सुवर्ण'विजेत्या मीराबाईवर अभिनंदनाचा वर्षाव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची वेटलिफ्टिंगपटू मीराबाई चानूने शनिवारी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. हे तिचे राष्ट्रकुलमधील सलग दुसरे, तर भारताचे यंदाच्या स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक ठरले. याबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.

गेल्या वर्षी टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक पटकावणाऱ्या मीराबाईने आपला दबदबा कायम ठेवताना महिलांच्या वेटलिफ्टिंगमधील ४९ किलो वजनी गटात विक्रमी वजनासह सुवर्णपदकाला गवसणी घातली. तिने स्नॅचमध्ये ८८ किलो आणि क्लीन अ‍ॅण्ड जर्कमध्ये ११३ किलो असे एकूण २०१ किलो वजन उचलत सोनेरी यश संपादन केले. विशेष म्हणजे मीराबाईने स्नॅच, क्लीन अ‍ॅण्ड जर्क आणि एकूण वजन या तिन्ही विभागांमधील राष्ट्रकुल स्पर्धेतील सर्वाधिक वजनाचे विक्रम आपल्या नावे केले.

मीराबाई आणि रौप्यपदक जिंकणाऱ्या मॉरिशसच्या मारीच्या (१७२) एकूण वजनामध्ये २९ किलोचा फरक होता. यावरूनच मीराबाईचे वर्चस्व सिद्ध झाले. तिने स्नॅचमधील तीनपैकी दोन प्रयत्नांत अनुक्रमे ८४ आणि ८८ किलोचे वजन उचलले. तिचा ९० किलोचा प्रयत्न सदोष ठरला. त्यानंतर क्लीन अ‍ॅण्ड जर्कमध्ये तिने १०९ आणि ११३ किलोचे वजन यशस्वीपणे उचलले. अखेरीस तिला ११५ किलोचे वजन उचलता आले नाही, मात्र तिने पहिल्या यशस्वी प्रयत्नासह सुवर्णपदक निश्चित केले होते.



सुवर्णपदक जिंकल्यानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना मीराबाई म्हणाली की, राष्ट्रकुल स्पर्धेत विक्रमी कामगिरीसह सुवर्णपदक आपल्या नावे केल्याने मी खूप आनंदित आहे.

# झिम्बाब्वेविरुद्ध वनडे मालिकेसाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा



सुंदर, चहरचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

झिम्बाब्वेविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर आणि वेगवान गोलंदाज दीपक चहर यांचे संघात पुनरागमन झाले आहे. तारांकित फलंदाज केएल राहुल मात्र या मालिकेलाही मुकणार आहे.

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात अनुक्रमे १८, २० आणि २२ ऑगस्टला तीन एकदिवसीय सामने होणार आहेत. या मालिकेसाठीही भारताच्या प्रमुख खेळाडूंना विश्रांती देण्यात आली असून शिखर धवन या संघाचे नेतृत्व करेल. महाराष्ट्राचा फलंदाज राहुल त्रिपाठीचाही या संघात समावेश करण्यात आला आहे.

संघ : शिखर धवन (कर्णधार), ऋतुराज गायकवाड, शुभमन गिल, दीपक हुडा, राहुल त्रिपाठी, इशान किशन (यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शार्दूल ठाकूर, कुलदीप यादव, अक्षर पटेल, आवेश खान, प्रसिध कृष्णा, मोहम्मद सिराज, दीपक चहर.

# राष्ट्रकुल स्पर्धेत भारताच्या बिंदियारानी देवीला रौप्यपदक

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**



भारताच्या बिंदियारानी देवीने राष्ट्रकुल स्पर्धेत महिला वेटलिफ्टिंगच्या ५५ किलो वजनी गटात रौप्यपदक जिंकले. त्यामुळे भारताच्या पदकांची संख्या वाढली आहे.

२३ वर्षीय बिंदियारानी देवी सोरखाईबाम हिने २०१६मध्ये पेनांग (मलेशिया) येथे झालेल्या जागतिक युवा चॅम्पियनशिपमध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण केले आणि दहाव्या स्थानावर राहिली. तिने उझबेकिस्तानमधील ताश्कंद येथे झालेल्या जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धेत भारतासाठी महिलांच्या ५५ किलो क्लीन अ‍ॅण्ड जर्क प्रकारात सुवर्णपदक जिंकले. २०१९ साली दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेत तिने सुवर्णपदक जिंकले होते. २०१९मध्ये कॉमनवेल्थ चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले, तर खेलो इंडिया महिला वेटलिफ्टिंग लीग २०२२मध्ये राष्ट्रीय विक्रम करून सुवर्णपदक जिंकले होते.

# टी-२० वर्ल्डकपसाठी लवकरच होणार टीम इंडियाची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडिया सतत आंतरराष्ट्रीय मालिका खेळत आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध सध्या भारतीय संघ टी-२० मालिका खेळत आहे. या दरम्यान टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी संघ निवड होण्याची चिन्हे आहेत.

टी-२० आशिया कप २७ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. एका वृत्तानुसार त्यासाठी संघाची नावे ८ ऑगस्टपर्यंत पाठवायची आहेत. आशिया चषक स्पर्धेसाठी निवडलेला १५ सदस्यीय संघच टी-२० विश्वचषक स्पर्धेत उतरण्याची शक्यता आहे. म्हणजेच येत्या आठवडाभरात विश्वचषकासाठी संघाचे चित्र स्पष्ट होणार आहे.




हे खेळाडू आशिया कपमधील पाच सामने आणि ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सहा टी-२० सामन्यांमध्ये खेळताना दिसणार आहेत. म्हणजेच विश्वचषकापूर्वी त्यांना किमान १० सामने खेळायला मिळणार आहेत.

विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि केएल राहुल तिघेही वेस्ट इंडिजविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतून बाहेर आहेत. या मालिकेतील पहिल्या सामन्यात कर्णधीर रोहित शर्माने अर्धशतक झळकावले. २०२२च्या आंतरराष्ट्रीय टी-२०मधील हे त्याचे पहिले अर्धशतक आहे. दिनेश कार्तिकने आपल्या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर टी-२० विश्वचषकासाठी आपले स्थान जवळपास पक्के केले आहे. विराट कोहली आणि केएल राहुलच्या पुनरागमनामुळे दीपक हुडा, श्रेयस अय्यर आणि संजू सॅमसन यांना संघात स्थान कसे मिळवता येईल ही निवड समितीसाठी मोठी डोकेदुखी ठरणार आहे.

# चहावाल्याचा मुलगा ते पदक विजेता वेटलिफ्टर

## सांगलीतील संकेतच्या जिद्द, संघर्ष अन् मेहनतीची कहाणी



**सांगली : प्रतिनिधी**

बर्मिंगहॅम येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत महाराष्ट्राच्या संकेत सरगरने वेटलिफ्टींगमध्ये रौप्यपदक पटकावत भारताचे पदकांचे खाते उघडले आहे. २१ वर्षीय संकेत मूळचा सांगलीचा. त्याने प्रतिकूल परिस्थितीवर जिद्दीने मात करीत संघर्ष व मेहनतीने करिअर घडविले आहे.

संकेतचे वडील पान आणि चहाचा गाडा चालवून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करतात. संकेतही त्यांनी मदत करतो. तो वडिलांच्या गाड्यावर वडे बनवतो तसेच पानटपरीदेखील चालवतो. संकेतच्या वडिलांनी प्रतिकूल परिस्थितीत आपल्या चार मुलांना चांगले शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात यशस्वी खेळाडू बनवले आहे. संकेतने जिंकलेल्या पदकानंतर माझी ओळख बदलली असल्याचे त्याचे वडील अभिमानाने सांगतात.

दोन महिन्यांपूर्वी हरियाणामधील पंचकुला येथे झालेल्या खेलो इंडिया युथ गेम्समधील वेटलिफ्टिंगमध्ये संकेतची लहान बहीण काजल हीनेही महाराष्ट्राला पहिले सुवर्णपदक जिंकून दिले होते. संकेत आणि काजल या बहिण-भावांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळवून मोठी कामगिरी केलेली आहे.

संकेतच्या नावावर सिंगापूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय वेटलिफ्टिंगमध्ये स्पर्धेत २५६ किलोग्रॅम वजन उचलण्याचा विक्रम आहे. राष्ट्रीय स्तरावरही त्याने अनेक पदके मिळवली आहेत. पदकाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com